सोमवार, २६ सप्टेंबर २०२२
◆ वर्ष १५ ◆ अंक ६९
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## पाकिस्तान जिंदाबादच्या घोषणा देणाऱ्यांवर देशद्रोहाचा गुन्हा



**पुणे** : पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया संघटनेच्या समर्थकांनी शुक्रवारी पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केलेल्या आंदोलनावेळी पाकिस्तान जिंदाबाद अशा घोषणा दिल्या होत्या. या प्रकरणी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानंतर पोलिसांकडून देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बंडगार्डन पोलीस ठाण्यात आरोपींवर दाखल असलेल्या गुन्ह्यात आता देशद्रोहाचे नवीन कलम नमूद झाले आहे. राष्ट्रीय तपास संस्थेकडून (एनआयए) दहशतवाद्यांशी संबंध असल्याच्या आरोपातून पीएफआयविरोधात देशभर कारवाई करीत विविध ठिकाणी छापे टाकण्यात आले होते. या कारवाईविरोधात पुण्यात पीएफआय कार्यकर्त्यांनी आंदोलन करून घोषणाबाजी केली होती. त्यांना दणका बसला आहे.

अंतरंग
रायगडात ३७४७ मूर्तींची होणार प्रतिष्ठापना/२
रसायनीत लम्पी आजाराने बैलाचा मृत्यू/५
कर्णधार हरमनप्रीतकडून दिप्ती शर्माची पाठराखण/८

# माथाडीभूषण पुरस्कारांचे नवी मुंबईत वितरण

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

माजी आमदार स्व. अण्णासाहेब पाटील यांच्या ८९व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र राज्य माथाडी, ट्रान्सपोर्ट आणि जनरल कामगार युनियनच्या वतीने रविवारी (दि. २५) माथाडी कामगार मेळावा आणि गुणवंत कामगार पुरस्कार, माथाडीभूषण पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात झाला. या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण झाले.

तुर्भे येथील एपीएमसी मार्केटमध्ये झालेल्या या सोहळ्यास कामगारमंत्री सुरेश खाडे, आमदार सर्वश्री गणेश नाईक, मंदा म्हात्रे, प्रवीण दरेकर, निरंजन डावखरे, छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, महेश शिंदे, माजी खासदार संजीव नाईक, माजी आमदार नरेंद्र पाटील, संदीप नाईक, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक डक आदी उपस्थित होते.

### स्व. अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या निधीत वाढ करणार –मुख्यमंत्री शिंदे



समाजातील सर्व घटकांना न्याय देणारे हे सरकार आहे. माथाडी कामगारांच्या घरांचा, त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा तसेच वैद्यकीय सुविधांचा प्रश्न सोडवण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. स्व. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या निधीत वाढ केली जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या वेळी केले. नवी मुंबईतील माथाडी तसेच भूमिपुत्रांना न्याय देण्यात येईल. येथील प्रकल्पांना चालना देऊ, असेही त्यांनी सांगितले.

### माथाडी कामगारांच्या चळवळीमागे भक्कमपणे उभा –उपमुख्यमंत्री फडणवीस

या वेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मागील २०१४ ते २०१९च्या काळात माथाडी कामगारांच्या अनेक प्रश्नांवर सकारात्मक निर्णय घेतले. अनेक प्रश्न सोडविले. या काळात स्व. अण्णासाहेब पाटील महामंडळाला पुनरुज्जीवित केले. त्या माध्यमातून ५० हजार मराठा तरुणांना उद्योजक होण्याची संधी मिळाली. माथाडी कामगारांच्या चळवळीमागे आपण भक्कमपणे उभे आहोत. कामगारमंत्री सुरेश खाडे, आमदार गणेश नाईक यांनीही विचार मांडले. माजी आमदार नरेंद्र पाटील यांनी प्रास्ताविक केले.

# चिरनेर जंगल सत्याग्रहातील हुतात्म्यांना अभिवादन

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**



ऐतिहासिक चिरनेर जंगल सत्याग्रहाचा ९२वा स्मृतिदिन रविवारी (दि. २५) झाला. यानिमित्त भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्यासह अन्य मान्यवरांनी हुतात्म्यांच्या स्मृतींना अभिवादन केले.

राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या सविनय चळवळीचा एक भाग म्हणून २५ सप्टेंबर १९३० रोजी उरण तालुक्यातील चिरनेर येथे जंगल सत्याग्रह झाला. त्या वेळी ब्रिटीश सरकारने अमानुषपणे सत्याग्रहींवर गोळीबार केला. यात धाकू गवत्या फोफेरकर, नाग्या महादू कातकरी (दोघेही चिरनेर), आलू बेमट्या म्हात्रे (दिघोडे), आनंदा माया पाटील (धाकटी जुई), रामा बामा कोळी (मोठी जुई), रघुनाथ मोरेश्वर शिंदे (कोप्रोली), हसुराम बुधाजी घरत (खोपटे) व परशुराम रामा पाटील (पाणदिवे) यांना हौतात्म्य आले. या हुतात्म्यांच्या स्मरणार्थ दरवर्षी जंगल सत्याग्रहाचा स्मृतिदिन कार्यक्रम आयोजित केला जातो.

शूरवीर हुतात्म्यांना पोलिसांच्या वतीने बंदुकांच्या तीन फैरी झाडून मानवंदना देण्यात आली, तर मान्यवरांनी हुतात्मा स्तंभास पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले.



# चंदिगड विमानतळाला भगतसिंग यांचे नाव

### मन की बात कार्यक्रमात पंतप्रधान मोदींची घोषणा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी (दि. २५) मन की बातद्वारे देशवासीयांना संबोधित केले. या वेळी त्यांनी योग, खेळ, शिक्षण, पर्यटन, पर्यावरण अशा विषयांवर भाष्य केले. भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचाही त्यांनी उल्लेख केला. विशेष म्हणजे त्यांनी या वेळी चंदिगड विमानतळाला शहीद भगतसिंग यांचे नाव दिले जाईल, अशी घोषणा केली.

देशाच्या स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात २८ सप्टेंबर हा विशेष दिवस आहे. या दिवशी आपण थोर देशभक्त शहीद भगतसिंग यांची जयंती साजरी करू. भगतसिंग यांच्या जयंतीच्या अगोदर केंद्र सरकारने त्यांना श्रद्धांजली म्हणून एक महत्त्वाचा निर्णय घेतला



आहे. चंदिगड विमानतळाचे नाव बदलून या विमानतळाला शहीद भगतसिंग यांचे नाव दिले जाईल, असे पंतप्रधान मोदींनी सांगितले.

पुढे बोलताना पंतप्रधान मोदींनी योगविद्येवर भाष्य केले. शारीरिक व मानसिक स्वास्थ्यासाठी योगसाधना खूप महत्त्वाची आहे हे संपूर्ण जगाने स्वीकारले आहे. मधुमेह आणि रक्तदाबाच्या अडचणींवर मात करण्यासाठी योग खूप फायदेशीर ठरतो. योगाचे हेच महत्त्व ओळखून संयुक्त राष्ट्राने २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून साजरा करण्याचे ठरवलेले आहे, असे ते म्हणाले.

आपल्या देशात सध्या उत्सवांचे पर्व आहे. उद्या नवरात्रीचा पहिला दिवस आहे. या नऊ दिवसांत आपण उपवास करतो तसेच काही नियम पाळतो. नवरात्रीनंतर विजयादशमी साजरी केली जाईल. या सणांमध्ये भक्तीभाव आध्यात्मिकतेसोबतच अनेक संदेश असतात, असेही पंतप्रधान मोदी यांनी नमूद केले.

## किल्ले रायगडावर पिंडदान कार्यक्रम?

**महाड : प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीस्थळाजवळच पिंडदान केले जात असल्याचा व्हिडीओ सोशल मीडियात व्हायरल होत आहे. त्यामुळे खळबळ माजलीय.

किल्ले रायगडावर २४ सप्टेंबरला दुसरा शिवराज्याभिषेक दिन कार्यक्रम संभाजी ब्रिगेड साजरा करीत असताना त्याच दिवशी ही घटना उघडकीस आली, मात्र याबाबत कोणतीही तक्रार दिली गेली नसल्याचे महाड पोलिसांनी सांगितले.

## निवडक

### तामिळनाडूतही विद्यार्थिनींचे आक्षेपार्ह फोटो, व्हिडीओ रेकॉर्ड

**चेन्नई** : पंजाबच्या मोहालीमधील विद्यापिठातील हॉस्टेलमध्ये एक विद्यार्थिनी इतर विद्यार्थिनींचे अंघोळ करतानाचे व्हिडीओ रेकॉर्ड करून सिमला येथील आपल्या बॉयफ्रेंडला पाठवत असल्याचे समोर आल्यानंतर खळबळ उडाली होती. आता तामिळनाडूतील मदुराईमध्ये एका महाविद्यालयात असाच प्रकार घडला आहे. हॉस्टेलमधील विद्यार्थिनींचे आक्षेपार्ह फोटो, व्हिडीओ पाठविल्याप्रकरणी एक विद्यार्थिनी व तिच्या मित्राला पोलिसांनी अटक केलीय.

### तिरुपती बालाजी देवस्थानची संपत्ती, मालमत्ता जाहीर

**तिरुपती** : देशातील श्रीमंत मंदिरांपैकी एक असलेल्या तिरुपती बालाजी देवस्थानने आपली संपत्ती आणि मालमत्ता जाहीर केली आहे. देशात देवस्थानच्या ९६० मालमत्ता असून त्यांची किंमत ८५,७०५ कोटी रुपये आहे. विविध राष्ट्रीयकृत बँकांमध्ये १४ हजार कोटींहून अधिक रुपयांच्या ठेवी आहेत, तर १४ टन सोन्याचा साठाही देवस्थानाकडे आहे, असे मंदिराचे चेअरमन वाय वी सुब्बा रेडी यांनी म्हटले आहे.

# खालापुरातील मोरबे धरणात आढळले दोन व्यक्तींचे मृतदेह

### शरीरावर जखमा; पोलिसांचा तपास सुरू

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील मोरबे धरणात एक महिला व एक पुरुष असे दोन मृतदेह आढळल्याने खळबळ उडाली आहे. ते बुडाले? त्यांनी आत्महत्या केली? की कुणी त्यांची हत्या करून पाण्यात फेकून दिले याबाबत उलट सुलट चर्चा केली जात आहे, मात्र संबंधित महिला व पुरुषाच्या शरीरावर जखमा झाल्याचे दिसून आल्याने घातपाताचा संशय व्यक्त होत आहे. त्या दृष्टीने खालापूर पोलिसांनी तपास सुरू केला आहे.



मोरबे धरणात महिला व पुरुषांचे मृतदेह असल्याची खबर खालापूर पोलिसांना रविवारी (दि. २५) सकाळी मिळाली. त्यानुसार पोलीस पथक घटनास्थळी दाखल झाले. स्थानिक तरुणांनी धरणातून दोन्ही मृतदेह पाण्यातून बाहेर काढले. पंढरीनाथ विष्णू सखुंडे (वय ४०, रा. पनवेल) व प्रतिभा प्रकाश म्हात्रे (३६, मोहो, चिखले, पनवेल) अशी मृत व्यक्तींची नावे आहेत.

पोलिसांनी मृतदेहांची तपासणी केली असता दोघांच्याही शरीरावर जखमा दिसून आल्या आहेत. त्यामुळे या घटनेत घातपात झाला असल्याचा संशय व्यक्त करण्यात येत असून, निरीक्षक बाळा कुंभार व सहाय्यक निरीक्षक सूर्यवंशी अधिक तपास करीत आहेत.

# ‘पाकिस्तान जिंदाबाद’ला मनसेचे ‘हर हर महादेव’ने प्रत्युत्तर

**पुणे : प्रतिनिधी**

पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया संघटनेच्या कार्यकर्त्यांचा पाकिस्तान जिंदाबाद अशा घोषणा देतानाचा व्हिडीओ व्हायरल झाल्यानंतर मनसेने पुण्यात एल्गार पुकारला आहे. पाकिस्तान जिंदाबादच्या घोषणेला मनसेकडून हर हर महादेव अशा घोषणेने उत्तर देण्यात आले. पुण्यातील अलका टॉकीज चौकात रविवारी (दि. २५) हे आंदोलन करण्यात आले.



राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) आणि सक्तवसुली संचालनालय (ईडी) यांनी गुरुवारी पीएफआयच्या देशभरातील कार्यालयांवर छापे टाकून १०० पेक्षा जास्त जणांना अटक केली होती. त्यानंतर पीएफआयच्या कार्यकर्त्यांकडून शुक्रवारी पुण्यातील जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ निदर्शने करण्यात आली. त्या वेळी या कार्यकर्त्यांनी पाकिस्तान जिंदाबाद अशा घोषणा दिल्या. या संदर्भातील व्हिडीओही व्हायरल झाले आहेत.

या पार्श्वभूमीवर मनसेकडून रविवारी पुण्यात आंदोलन करण्यात आले. या वेळी मनसे कार्यकर्त्यांनी हर हर महादेवच्या घोषणा दिल्या. त्याचबरोबर दूध मांगोगे तो खीर देंगे, भारत मांगोगे तो पाकिस्तान को चिर देंगे अशा घोषणा देत पाकिस्तानच्या झेंड्याची प्रतिकृती जाळून निषेध व्यक्त केला. दरम्यान, अलका टॉकीज चौकात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

## प. विभाग दुलीप चषकाचा मानकरी

**कोईम्बतुर** : पश्चिम विभागाने अंतिम फेरीत दक्षिण विभागाचा २९४ धावांनी पराभव करून दुलीप करंडक स्पर्धा जिंकली आहे. १९व्यांदा त्यांनी ही कामगिरी केली. **(पान ८ वर..)**




## नवरात्रोत्सव विशेष

# वेणगाव येथील जागृत महालक्ष्मी

**कर्जत : विजय मांडे**

कर्जत रेल्वेस्थानकापासून पूर्वेकडे चार किलोमीटर अंतरावर कर्जत-जांभिवली रस्त्यावर वेणगाव येथे श्री महालक्ष्मीचे स्वयंभू देवस्थान आहे. हे देवस्थान प्राचीन व जागृत असून पंचक्रोशीसह इतर ठिकाणांहून असंख्य भाविक नवरात्रोत्सवात आवर्जून दर्शनासाठी येतात.

या देवास्थानची आख्यायिका अशी सांगितली जाते की, कोल्हापूरची श्री महालक्ष्मी आपल्या बहिणीस भेटावयास जाताना तिच्या रथाचे चाक घसरले व थोड्याच अंतरावर रथाच्या एका घोड्याचा पाय घसरला. श्री महालक्ष्मी तेथेच वास करून राहिली ते ठिकाण म्हणजेच सद्यस्थितीतील असलेले



श्री महालक्ष्मी मंदिर होय. देवीच्या रथाचे चाक व घोड्याचा पाय जेथे घसरला ती ठिकाणे मंदिर परिसरात आजही पहावयास मिळतात.

सुमारे दोनशे वर्षांपूर्वी वेणगाव येथील एक गावकऱ्याच्या स्वप्नात देवीने येऊन येथे वास करीत असल्याचा दृष्टांत दिला.

> **वेणगाव येथील श्री महालक्ष्मी देवी नवसाला पावणारी म्हणून प्रसिद्ध आहे. गेल्या वर्षी कोरोना महामारीमुळे नवरात्रोत्सव साजरा करण्यात अडचण होती. भक्तांना कोरोनाचे नियम पाळून दर्शन देण्यात येत होते. यंदा दर्शन घेण्यासाठी भाविकांची गर्दी अपेक्षित आहे. अगदी दररोज चार-पाच किमी अनवाणी पायांनी येणाऱ्यांची संख्यासुद्धा मोठी आहे.**
> **–रंजन दातार, अध्यक्ष, श्री महालक्ष्मी देवस्थान, वेणगाव**

त्यानुसार गावकऱ्यांनी तिथे निवारा बांधला. देवीची दैनंदिन पूजा-अर्चा सुरू केली व ती आजतागायत अव्याहतपणे सुरू आहे. काळाच्या ओघात मंदिर जीर्ण झाले होते तसेच भाविकांच्या वाढत्या गर्दीमुळे होणारी गैरसोय टाळण्यासाठी या श्रद्धास्थानाचा जीर्णोद्वार १९९७ साली विश्वस्त समितीने केला. या देवीचे स्थान स्वयंभू असून तिच्या नवसाची प्रचिती अनेक भक्तांना आलेली आहे. त्यामुळे पंचक्रोशी तसेच लांबून भक्तगण महालक्ष्मीच्या दर्शनास येत असतात.

देवीचे मंदिर अतिशय रम्य अशा ठिकाणी आहे. आजूबाजूला डोंगर, शेती, वनश्री असल्याने या परिसरात आल्यावर खूपच प्रसन्न वाटते.

# रायगडात ३७४७ मूर्तींची होणार प्रतिष्ठापना

## नवरात्रोत्सवाची जिल्ह्यात तयारी पूर्ण; भाविकांमध्ये उत्साह

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगडात नवरात्र उत्सव सोमवारपासून (दि. २६) सुरू होत आहे. या उत्सवाची जय्यत तयारी झाली आहे. जिल्ह्यात एक हजार २९४ मूर्ती, दोन हजार २९५ घट व १५९ फोटो असे एकूण तीन हजार ७४७ मूर्ती, घट, फोटोंची प्रतिष्ठापना केली जाणार आहे. नवरात्रोत्सवावर यंदा पावसाचे सावट आहे. दरम्यान नवरात्रोत्सवानिमित्त उत्साहात तयारी पूर्ण झाली आहे. भाविकांमध्ये यावर्षी मोठ्या प्रमाणात सर्वत्र उत्साह दिसून येत आहे.



नवरात्र उत्सव कालावधीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून सुरक्षेसाठी अपर पोलीस अधीक्षकांसह जिल्ह्यातील ८ उपविभागीय पोलीस अधिकारी, २८ पोलीस ठाण्यातील ८०० पोलीस अधिकारी, कर्मचारी, ९८ सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, ४०० होमगार्ड जवान, राज्य राखीव पोलीस दल, आरसीपी, शिघ्रकृतीदलाचे प्रत्येकी एक तुकडी तसेच आठ स्ट्रायकींग फोर्स रस्त्यावर उतरणार असल्याचे सांगण्यात आले.

पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपविभागीय अधिकारी, २७ पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी अशा वेगवेगळ्या स्तरावर पोलीस पाटील, नवरात्रोत्सव मंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेण्यात आल्या आहेत. गरबासह वेगवेगळ्या प्रकारचे कार्यक्रम करताना, कायदा सुव्यवस्था अबाधित राहिल याकडे लक्ष देण्याच्या सूचना केल्या आहेत. स्वयंसेवक नेमणे, सीसीटीव्ही कॅमेरे लावणे, लाईटची सुविधा ठेवणे, पार्किंगच्या ठिकाणी विद्युत व्यवस्था ठेवणे. महिलांची छेडछाड होणार नाही याची काळजी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सण शांततेत व आनंदात साजरा करण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

सोमवारपासून घटस्थापनेने नवरात्र उत्सवाची सुरूवात होत आहे. ९ दिवस चालणाऱ्या या उत्सवासाठी भक्तमंडळी तयारी करीत आहेत. ठिकठिकाणी सार्वजनिक मंडळांचे मंडप , सजावट रोषणाई सुरू आहे. उत्सवाची तयारी जोरदार सुरू आहे. गरबा रास, दांडिया खेळण्यासाठी तरूणाई सज्ज झाली आहे. मागील दोन वर्षे कोरोनामुळे या उत्सवावर निर्बंध आले होते, परंतु कोरोनामुक्ती नंतर आता सगळे व्यवहार निर्बंधमुक्त झाले आहेत. त्यामुळे यंदाचा उत्साह दरवर्षीच्या तुलनेत अधिकच असल्याचे पहायला मिळत आहे. देवीच्या पूजेसाठी लागणारे घट, फुले, सजावटीचे, पूजेचे साहित्य यांची चांगली विक्री होत आहे. दांडिया खरेदी केल्या जात आहेत. व्यावसायिकांमध्येही समाधानाचे वातावरण आहे.

### पावसाचे सावट

अद्यापही पावसाचे सावट आहे. जिल्ह्याच्या सर्वच भागात ऊन-पावसाचा खेळ सुरू आहे. निरभ्र असलेल्या आकाशात अचानक ढगांची दाटी होते आणि पावसाच्या सरी बरसायला सुरुवात होते. हवामान खात्याच्या अंदाजानुसार अजूनही परतीचा पाऊस सुरू झालेला नाही. त्यामुळे नवरात्र उत्सवावर पावसाचे सावट पहायला मिळते आहे. त्यामुळे देवीभक्तांमध्ये काहीसे निराशेचे वातावरण आहे.

# कार्यकर्त्यांना वेळही दिला जात नव्हता

## शिंदे गटाचे प्रवक्ते दीपक केसरकर यांचा उद्धव ठाकरेंवर आरोप



**मुंबई : प्रतिनिधी**

सत्ता गेल्यावर घरोघरी फिरण्याची वेळ आली. पूर्वी तुम्ही तुमच्या ऑफिसमध्येही येत नव्हता. कार्यकर्त्यांना वेळही देत नव्हता, असा टोला शिंदे गटाचे प्रवक्ते दीपक केसरकर यांनी शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना लगावतानाच युवा सेनेचे प्रमुख आदित्य ठाकरे यांनाही चांगलेचे सुनावले आहे.

एकनाथ शिंदे यांनी बंडखोरी केल्यानंतर शिवसेना विरुद्ध शिंदे गट असा थेट सामना राज्यात पाहायला मिळत आहे. यामध्ये बंडखोरी, गद्दारी, ५० खोके अशा अनेक मुद्द्यांची चर्चा चालू आहे. ठाकरे गटाकडून विविध आरोप शिंदे गटावर केले जात आहेत. त्यातच वेदान्ता-फॉक्सकॉन प्रकल्प राज्याबाहेर गेल्यामुळे विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर परखड शब्दांत टीका केली आहे. शिवसेना आमदार आदित्य ठाकरे यांनी या प्रकरणाचा निषेध करण्यासाठी शनिवारी तळेगावमध्ये जनआक्रोश यात्रा काढली. त्यावरून आता शिंदे गटाकडून प्रत्युत्तर देण्यात आले असून शिंदे गटाचे प्रवक्ते दीपक केसरकरांनी आदित्य ठाकरेंना खोचक टोला लगावला आहे. तसेच, केसरकरांनी उद्धव ठाकरेंनाही सूचक शब्दांत इशारा दिला आहे. आदित्य ठाकरे सध्या राज्याच्या वेगवेगळ्या भागात फिरत आहेत. उद्धव ठाकरेही दसरा मेळाव्यानंतर नाशिक दौऱ्यावर जाणार आहेत. या पार्श्वभूमीवर दीपक केसरकरांनी टोला लगावला आहे. तुमची सत्ता गेली म्हणून आज तुम्ही हे करत आहात. शिवसैनिकांना साधी तुमची भेट उद्धव ठाकरेंकडून मिळत नव्हती. आमच्यासारखे ज्येष्ठ आमदार वर्षा बंगल्यासमोर रस्त्यावर उभे राहत असायचे. तुम्ही लोकांना खोटे सांगत फिरत आहात. त्यामुळे आता आम्हालाही खरे सांगत महाराष्ट्रभर फिरावे लागेल, पण आम्ही आमची कामे सांभाळून ते लोकांना सांगू. कामे ठेवून आम्ही आमच्या यात्रा काढणार नाही. माझी यात्रा असताना मी शाळांना भेटी दिल्या आहेत. आमच्या विभागाच्या बैठका घेतल्या आहेत. एवढे काम आम्ही दिवसरात्र करतो, असे केसरकर या वेळी म्हणाले.

# अजूनही काही आमदार, खासदार उद्धव ठाकरेंपासून दूर जातील

## परभणी येथे कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांचा दावा

**परभणी : प्रतिनिधी**

राज्यात सत्तांतर झाल्यानंतर शिंदे गटाकडे येण्याचा अनेकांचा कल दिसून येत आहे. हाच धागा पकडत पाच आमदार आणि दोन ते तीन खासदार शिंदे गटात येणार असल्याचा दावा राज्याचे कृषीमंत्री अब्दुल सत्तार यांनी परभणी येथील जाहीर सभेत बोलताना केला आहे.

कृषीमंत्री अब्दुल सत्तार हे सध्या विदर्भ आणि मराठवाड्याच्या दौऱ्यावर आहेत. शनिवारी ते परभणीत होते. या वेळी त्यांचा वाहन ताफा अडवण्याचा प्रयत्न शिवसैनिकांनी केला असता, सत्तार यांनी गाडीतून उतरून त्या शिवसैनिकांचे म्हणणे ऐकले आणि त्यांचे निवेदनही स्वीकारले.



अब्दुल सत्तार या दरम्यान पुढे म्हणाले, आम्ही ४० आमदार अधिक दहा, त्यात पाच आमदार आणखी येणार आहेत. पहिले दहा खासदार होते नंतर १२ खासदार झाले आता १३ झाले. दोन-तीन आणखी येणार आहेत. तरी हे लोक असली-नकली असे सांगताय, मग हे येणारे काय वेडे आहेत का? आता गल्ली-बोळात तुम्ही फिरत आहात. अगोदरच हे फिरले असते तर ही वेळ आली असती का? असाही सवाल त्यांनी केला. याशिवाय हे कशामुळे झाले, घरात बसल्यामुळे झाले. आज तुमची मैदानात उतरण्याची तयारी, लोकांना आसमान दाखवण्याचे स्वप्न पाहत आहात, मग अडीच वर्षे काय केले? मुख्यमंत्री हे छोट पद नाही, ते किती मोठे किती शक्तीशाली असते, याचा अंदाज मी लावू शकतो. ज्यावेळी होता त्यावेळी काही दिले नाही, आता नाहीत तर काय देणार? तुमची सत्ता येण्याचे स्वप्न दहा जन्मातही पूर्ण होणार नाही, असेही सत्तार यांनी उद्धव ठाकरे यांचे नाव न घेता बोलून दाखवले.

# अडीच वर्षांत तुम्ही सत्तेत राहून केले काय?

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा विरोधकांना सवाल

**पुणे : प्रतिनिधी**

अडीच वर्षे तुम्ही सत्तेत होता तेव्हा तुम्ही काय केले असा सवाल उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांनी प्रकल्पांबाबत केलेल्या आरोपांना उत्तर देताना केला आहे.

वेदान्त-फॉक्सकॉन प्रकल्प गुजरातला गेल्याचे समोर आल्यापासून राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. विरोधकांकडून शिंदे-फडणवीस सरकारवर जोरदार टीका केली जात आहे. तर विरोधकांच्या टीकेला सत्ताधाऱ्यांकडूनही प्रत्युत्तर दिले जात आहे. शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी वेदान्त-फॉक्सकॉन, बल्क ड्रग पार्क या प्रकल्पांपाठोपाठ महाराष्ट्राला मेडिसीन डिवाइस पार्कला देखील मुकावे लागल्याचे सांगत, राज्य सरकारच्या कारभारावर टीका केली आहे. त्यावर आता उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिले आहे.

फडणवीसे पुढे म्हणाले, वेदान्त-फॉक्सकॉन व बल्क ड्रग पार्क या दोन प्रकल्पांपाठोपाठ आता महाराष्ट्राला 'मेडिसीन डिवाइस पार्क' योजनेला देखील मुकावे लागले आहे. उत्तम दर्जाच्या पायाभूत सुविधा व कुशल मनुष्यबळ असताना महाराष्ट्रापासून आणखी एक प्रकल्प हिरावून घेण्यात आला आहे. याबद्दल सत्ताधाऱ्यांना माहिती आहे का? असा सवाल आदित्य ठाकरे यांनी शिवसेनेच्या नेत्या प्रियंका चतुर्वेदी यांचे ट्वीट शेअर करत केला आहे. यावर प्रत्युत्तर देताना उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले माझा त्यांना प्रश्न आहे की, 'मेडिसीन डिवाइस पार्क' हा प्रकल्प महाराष्ट्रात येणार होता याचा एक चिठ्ठीचा तरी ते पुरावा दाखवू शकतात का? उगाच काहीपण मनात येईल ते बोलायचे, ते अडीच वर्ष सत्तेत होते. मात्र अडीच वर्षांत काहीच केले नाही. केवळ केंद्र सरकारला शिव्या देण्याचे काम केले आणि



आता मनात येईल ते बोलत आहेत. माझा त्यांना एक सवाल आहे, किमान एक चिठ्ठी तरी दाखवा की 'मेडिसीन डिवाइस पार्क' महाराष्ट्रासाठी मंजूर झाला होता आणि मग तो दुसरीकडे गेला. रोज खोटे बोलायचे, रेटून बोलायचे असाही टोला त्यांनी लगावला आहे.

# कोप्रोलीत ई-श्रम कार्ड शिबिराला प्रतिसाद

## उरण तालुका भाजप ट्रान्सपोर्ट सेलचा उपक्रम

**उरण : प्रतिनिधी**

केंद्र शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी ई श्रम कार्ड आवश्यक आहे. वाहतूक क्षेत्रात काम करणाऱ्यांना जास्तीत जास्त विविध योजनांचा लाभ घेता यावा यासाठी भाजप ट्रान्सपोर्ट सेल उरण तालुक्याच्या माध्यमातून रविवारी (दि.२५) सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत उरण तालुक्यातील पूर्व विभागात असलेल्या साईकृपा इन्फॉरमेशन टेकनॉलॉजी कोप्रोली नाका, कोप्रोली येथे ई श्रम कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.



या शिबिराला जनतेचा, वाहतूकदारांचा उत्तम प्रतिसाद लाभला आहे. वाहतूक क्षेत्रात काम करणाऱ्या ड्रायवर यांना ई श्रम कार्ड मोफत काढून देण्यात आले. नागरिकांनी या फ्री ई श्रम कार्ड शिबिराचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. भाजप ट्रान्सपोर्ट सेलतर्फे आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात अनेक गरजूंना मदत झाल्याने सर्वांनी भाजपा ट्रान्सपोर्ट सेलचे आभार मानले आहेत. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी भाजपा ट्रान्सपोर्ट सेलचे उरण तालुकाध्यक्ष सुदेश पाटील, पूर्व विभाग अध्यक्ष शशी पाटील, गाव अध्यक्ष अभय पाटील, साईकृपा इन्फॉरमेशन टेकनॉलॉजि कोप्रोलीचे मालक राकेश पाटील, ई श्रम कार्ड काढून देणारे ऑपरेटर विकी कोळी तसेच भाजप ट्रान्सपोर्ट सेलचे सर्व पदाधिकारी सदस्यांनी विशेष मेहनत घेतली. या वेळी भाजप ट्रान्सपोर्ट सेलचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष विकी पाटील, बापूचे देव टॅक्सी चालक-मालक संघटना कोप्रोलीचे अध्यक्ष मनोहर म्हात्रे, बापूजी देव रिक्षा चालक-मालक संघटना अध्यक्ष गिरीश म्हात्रे, कल्पेश म्हात्रे, निलेश पाटील, दत्तराज म्हात्रे, नंदन म्हात्रे, पर्जन्य म्हात्रे, प्रितम म्हात्रे, योगेश गावंड, विकीभाई म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.



**खोपोली : भाजपतर्फे मध्यवर्ती कार्यालय पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती साजरी करण्यात आली. शहराध्यक्ष इंदरमल खंडेलवाल, सरचिटणीस हेमंत नांदे , प्रमोद पिंगळे, उपाध्यक्ष दिलीप पवार, चिटणीस सुनिता महर्षी, गोपाळ बावस्कर, युवा मोर्चा अध्यक्ष अजय इंगुळकर, स्नेहल सावंत, सचिन मोरे, संजय म्हात्रे, विकास खरपुडे, विजय तेंडूलकर, अपर्णा साठे, हिंमतराव मोरे आदी कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते** (छाया : विनायक मांडपे)

# पेण वकील असोसिएशन अध्यक्षपदी अॅड. म्हात्रे

**अलिबाग : प्रतिनिधी**

पेणच्या वकील बार असोसिएशनची नवीन कार्यकारिणी नुकतीच जाहीर करण्यात आली असून अध्यक्षपदी अॅड. भगवान विठ्ठल म्हात्रे यांनी निवड करण्यात आली आहे.

उर्वरित कार्यकारिणीमध्ये सचिव अॅड. आर. आर. म्हात्रे, खजिनदार अॅड. सुयोग सीताराम कडू, तर सदस्य म्हणून अॅड. माधुरी यशवंत म्हात्रे, अॅड. विशाल उमाकांत पाटील यांची सर्वांनुमते नियुक्ती करण्यात आली आहे. नवीन कार्यकारिणीला शुभेच्छा देण्यात आल्या.

# भाजप मोर्चाच्या वतीने सेवा पंधरवडा सोहळा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

भाजप उत्तर भारतीय मोर्चा अध्यक्ष राजेश राय यांच्या नेतृत्वाखाली नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने भारतीयांमधील विविधतेत एकता अखंडित राहावी या उद्देशाने सेवा पंधरवडा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या सोहळ्याला भाजप उत्तर भारतीय मोर्चा प्रदेश अध्यक्ष कृपाशंकर सिंह, माजी खासदार हरिवंश सिंह, भाजप आईटी सेल प्रमुख सतीश निकम, नवी मुंबई भाजप महामंत्री विजय घाटे, कृष्ण पाटील यासह मान्यवर उपस्थित होते. नवी मुंबई शहरात उत्तर भारतीयांची संख्या लक्षणीय आहे. आज उत्तर भारतीय समाज नवी मुंबईत समरस झाला आहे. विविधतेत एकरूप झाला असून या आनंद सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते असे महामंत्री कृष्णा पाटील यांनी सांगितले. या वेळी नवी मुंबईतील उत्तर भारतीय समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.




## दुखवटा

### विष्णू कडू

**उलवे नोड** : शिवाजीनगर (गव्हाण) येथील विष्णू दामाजी कडू यांचे रविवारी (दि. २५) अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ६९ वर्षे होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, सूना आणि नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा होम विधी मंगळवारी (दि. २७), दशक्रिया विधी मंगळवारी (दि. ४) तर उत्तरकार्य विधी शुक्रवारी (दि. ७) राहत्या घरी शिवाजीनगर येथे होणार असल्याची तसेच कोणत्याही प्रकारचे दुखवटे स्वीकारले जाणार नसल्याची माहिती त्यांचे चिरंजीव विनोद, जितेंद्र आणि राकेश कडू यांनी दिली आहे.



### जगजीवन मिश्रा

**नवी मुंबई :** जगजीवन मिश्रा यांचे वयाच्या ६८व्या वर्षी आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, दोन मुली, जावई नातवंडे असा मोठा परिवार आहे. जगजीवन मिश्रा हे पत्रकार ज्योती दुबे यांचे वडील होत.







पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
सोमवार, दि. २६ सप्टेंबर २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड कोव्हॅक्सिन कार्बेव्हॅक्स

सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.

# पनवेल शहरात सीसीटीव्ही वॉच

## गुन्हेगारी थांबविण्यासाठी उपाय



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर व परिसरात महत्वाच्या गर्दीच्या ठिकाणी आता तिसऱ्या डोळ्याची नजर रोखून असल्याने आता वेगवेगळ्या प्रकारच्या गुन्हेगारीला लगाम बसणार आहे.

पनवेल शहर पोलीस ठाण्याचे पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांनी नुकतीच पनवेल ज्वेलर्स असोसिएशनची बैठक घेतली होती. या वेळी त्यांनी व्यापारी बंधूना पनवेल शहर व परिसरात महत्वाच्या गर्दीच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे उभारण्यासंदर्भात सहकार्य करण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला व्यापारी बंधूनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत शहरातील मोक्याच्या ठिकाणी कॅमेरे उभारण्याचे ठरविले यासाठी व्यापारी राजेश मेहता, संजय जैन व निरज कोठारी यांनी पुढाकार घेऊन त्या संदर्भात नियोजन केले.

शहरातील प्रवेशद्वारे त्यामध्ये भाजी मार्केट, टपाल नाका, छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसर, कापड बाजार, जोशी आळी, जय भारत नाका परिसर, मोहल्ला परिसर आदींसह अशा विविध ठिकाणी हे कॅमेरे बसण्याचे निश्चित केले. त्यानुसार ३० महत्वाच्या जागा ठरवून तेथे कॅमेरे बसविण्यात आले आहेत. यासाठी टेक्नो आय ऑर कॅमेरा ब्रँड दाहून टेक्नॉलॉजी चे नईमुद्दीन शेख (रिंटू) यांनी विशेष सहकार्य करून हे कॅमेरे उभारले आहेत. त्यासाठी पनवेल ज्वेलर्स असोसिएशनला जवळपास पाच लाख रुपयाचा खर्च आतापर्यंत आला आहे. या कॅमेऱ्यांचा कंट्रोल पनवेल शहर पोलीस यांच्यासह असोसिएशनच्या तिघांकडे राहणार आह. यामुळे निश्चितच शहरातील गुन्हेगारीला आळा बसणार आहे.

> **पनवेल शहर व परिसरात महत्त्वाच्या गर्दीच्या ठिकाणी सीसीटिव्ही कॅमेरे उभारण्यासंदर्भात पनवेल ज्वेलर्स असोसिएशनला आवाहन केले होते. त्याला त्यांनी उत्तम प्रतिसाद दिल्याने निश्चितच वाढत्या गुन्हेगारीला आळा बसेल.**
>
> –विजय कादबाने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक

> **पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांनी नुकत्याच पनवेल ज्वेलर्स असोसिएशनच्या बैठकीत कॅमेरे बसविण्यासंदर्भात आवाहन केले होते. त्याला व्यापारी बांधवानी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने हे काम पूर्णत्वास येत आहे. याचा फायदा व्यापारी बांधवाना सुद्धा होणार आहे.**
>
> –संजय जैन, पनवेल ज्वेलर्स असोसिएशन

# पनवेल रेल्वे स्टेशनवर रक्तदान शिबिर

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल रेल्वे स्टेशनवर शनिवारी (दि. २४) चार इनरव्हील क्लब व एक रोटरी क्लब असे संयुक्तिक प्रोजेक्ट रक्तदान शिबिर आयोजित केले. इनरव्हील क्लबच्या डिस्ट्रिक्ट चेअरमन मुक्ती पानसे ह्यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविला गेला. या शिबिराचे उद्घाटन भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते झाले.

जिल्हा ईसीओ डॉ. शोभना पालेकर, निर्माती कल्पना कोठारीसुद्धा उपस्थित होत्या. इनरव्हील क्लब ऑफ पनवेलच्या अध्यक्ष संजीवनी मालवणकर ह्या प्रत्येकवर्षी रक्तदान शिबिर केईएम हॉस्पिटलच्या ब्लड बँकसोबत आयोजित करतात, पण मागच्या दोन वर्षांपासून कोरोनामुळे हे शिबिर घेता आले नाही. यावर्षी पाच क्लब मिळून हा प्रोजेक्ट करण्यात आला.

इनरव्हील क्लब ऑफ इंडस्ट्रिअल टाऊनच्या अध्यक्ष कल्पना नागवकर, इनरव्हील क्लब ऑफ न्यू पनवेलच्या अध्यक्ष अनुराधा शुक्ला, इनरव्हील क्लब ऑफ पनवेल सिटी हेतल बालाड, रोटरी क्लब ऑफ पनवेल मिडटाऊनचे अध्यक्ष पुंजाराम थोरात व उपाध्यक्ष महेश फुलपगारे आणि प्रत्येक क्लबचे सेक्रेटरी तथा मेंबर्स उपस्थित होते. सर्वांनी हातात बॅनर घेऊन रेल्वे स्टेशनवर जाऊन लोकांना रक्तदानासाठी प्रोत्साहित केले. सगळ्यांनी खूप हिरीरीने सहभाग घेत रक्तदानाचा उपक्रम राबविला. यात एकूण ८० बॉटल रक्त संकलित झाले.

# रोटरी क्लबकडून हृदयरोग जनजागृती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल आणि रोटरी क्लब ऑफ न्यू पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक हृदय दिनाचे औचित्य साधत हृदयरोग जनजागृती अभियान म्हणजेच धडकन हा उपक्रम रविवारी (दि. २५) वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह येथे राबविण्यात आला. या वेळी भाजप जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व पनवेल महापालिकेच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी भेट दिली.

या कार्यक्रमामध्ये हृदयाची काळजी कशी घ्यावी आणि अचानक हार्ट अटॅक आल्यानंतर काय करावे, अशा बऱ्याच प्रश्नांची उत्तरे उपस्थित असलेल्या जवळपास नागरिकांना मिळाली. या वेळी संपूर्ण भारतात प्रसिद्ध असलेले नामवंत हृदयरोगतज्ञ त्याचबरोबर पनवेल मनपा आयुक्त गणेश देशमुख, डॉ. अविनाश गुढे, डॉ. ऋषिकेश ठाकूर, रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलचे अध्यक्ष लक्ष्मण पाटील, सेक्रेटरी अनिल ठक्कर, रोटरी क्लब व न्यू पनवेलचे अध्यक्ष प्रदीप डावकर, पुष्पराज मेंडन, रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रिअल टाऊनचे अध्यक्ष कल्पेश परमार, हितेश राजपूत, रोटरी क्लब ऑफ पनवेल महानगरचे अध्यक्ष मुकुंद चौधरी आणि सेक्रेटरी सक्हेल पेंडसे, रोटरी क्लब ऑफ पनवेल होरायझोनचे अध्यक्ष स्वप्नील गांधी आणि सेक्रेटरी विनीत परमार उपस्थित होते.

# कारटेप चोरी करणाऱ्यास अटक

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर परिसरात उभ्या असलेल्या चार चाकी वाहनाच्या गाडीच्या काचा फोडून आतून महागडे कार टेपची चोरी करणाऱ्या चोरट्यास पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे गाडीची काच तोडून कार टेप चोरी करणारा सराईत आरोपीचा पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांच्या पथकाने जुबेर रईस अहमद (वय ३२, रा. जीवदानी बिल्डिंग, मुंब्रा) या आरोपीला कळवा परिसरातून पनवेल शहर गुन्हे प्रकटीकरण पथकाने ताब्यात घेतले. त्याने पनवेल शहरातील फिर्यादी जयेश संतोष म्हात्रे (रा. टिळक रोड, पनवेल) यांची एमटीएनएल रोड परिसरातून कारटेप चोरी केल्याचे कबुल केल्याने त्याच्याकडून चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. पुढील तपास शहर पोलीस करीत आहेत.






**पनवेल : सेवा पंधरवड्यानिमित्त भाजप शहर मंडलच्या वतीने नवनाथ मंदिर येथे गरीब व गरजू नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी व नेत्रतपासणी, कोरोना बूस्टर डोस तसेच मोफत औषध व चष्मे वाटप शिबिर रविवारी आयोजित करण्यात आले होते. या वेळी शहर अध्यक्ष जयंत पगडे, माजी नगरसेवक मनोज भुजबळ, तेजस कांडपिळे, प्रकाश बिनेदार, माजी नागरसेविका चारुशीला घरत, सुशीला घरत, भाजप नेते संदीप पाटील, जगदिश घरत, प्रभाग अध्यक्ष विजय म्हात्रे, भाजप युवा नेते प्रतीक बहिरा, वैद्यकीय सेल उपाध्यक्ष कृष्णा देसाई, युवा कार्यकर्ते राकेश भुजबळ आदी उपस्थित होते.**



**पनवेल : सेवा पंधरवडा अंतर्गत भाजप ओबीसी युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष प्रसाद म्हात्रे यांनी पटेल पार्क येथे वृक्षारोपण केले. या वेळी सोशल मीडिया सेल शहर संयोजक प्रसाद हनुमंते, ओबीसी जिल्हा सरचिटणीस नीता माळी, स्नेहा पंडित, गीता रावल, पूजा तुपे, शैला दीक्षित, शुभ्रा पाटील, आरती रावल, जयश्री म्हात्रे, नरेंद्र सोनवणे, किशोर म्हात्रे, सुर्यकांत म्हात्रे, सुलोचना म्हात्रे, प्रशांत मानकामे, शुभम पंडित, नम्रता दीक्षित, रूपेश तुपे, श्वेता म्हात्रे आदी उपस्थित होते.**



**खारघर : सेवा पंधरवड्यानिमित्त खारघर तळोजा मंडल साऊथ इंडियन सेल व माजी नगरसेवक शत्रुघ्न काकडे यांच्या वतीने सेक्टर ३ गणेश विसर्जन घाट, बेलपाडा तलाव परिसर स्वच्छ करण्यात आला. या वेळी माजी नगरसेवक शत्रुघ्न काकडे, भाजप शहर मंडल सरचिटणीस दीपक शिंदे, गीता चौधरी, मोना अडवाणी, संध्या शारबिद्रे, साऊथ इंडिया सेल संयोजक श्रीनिवास कोडूरू व त्यांचे सहयोगी, रोहन शेट्टी आणि सहकारी, उद्योग सेल संयोजक राजेंद्र मांजरेकर, सोशल सेल संयोजक अजय माळी, संदीप कासार, शामल मॅडम, आकाश काकडे, रुपेश काकडे, अनिल काकडे, गौरव अमृतसागर, राहुल पाटील, रमेश कळंबोली, शैलेश मोरबेकर, पनवेल मनपा आरोग्य अधिकारी प्रवीण दशमीकर आणि कर्मचारी उपस्थित होते.**

# ‘सीकेटी’त ई-कन्टेन्ट डेव्हलोपमेंट कार्यशाळेची सांगता



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे ग्रंथालय विभागाने प्राध्यापकांसाठी सात दिवसांच्या ई-कन्टेन्ट डेव्हलोपमेंट विषयावर मार्गदर्शन पर कार्यशाळेचे आयोजन केले. या कार्यशाळेची सुरुवात रविवारी (दि. १८) झाली. या कार्यशाळेमध्ये ई-कन्टेन्ट डेव्हलोपमेंट तज्ञ भूषण कुलकर्णी यांनी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयातील १२७ प्राध्यापकांनी आपला उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला.


कार्यक्रमामध्ये कुलकर्णी यांनी व्हिडिओद्वारे व्याख्याने कसे बनवावेत याबद्दल सविस्तर माहिती दिली. तसेच व्हिडिओ बनवण्यासाठी लागणारे विविध ॲप व त्याचा वापर कसा करावा याबद्दल माहिती सांगितली. त्यानंतर १९ ते २३ सप्टेंबरदरम्यान सकाळी ९ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत महाविद्यालयातील १२२ प्राध्यापकांनी कुलकर्णी व त्यांच्या टीम सोबत आपली व्याख्याने रेकॉर्ड करून आपल्या महाविद्यालयाच्या CKT-MOOCS या यु ट्यूब चॅनेल वर अपलोड केली. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी ही महाविद्यालयाच्या यु ट्यूब चॅनेल ला भरभरून प्रतिसाद दिला आणि आपली पसंती दाखवली. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी CKT- MOOCS या यु ट्यूब चॅनेलचा वापर सर्वांनी जास्तीत जास्त करावा असे आवाहन केले. अशा या सात दिवसीय मार्गदर्शन पर कार्यशाळेची सांगता २३ सप्टेंबर २०२२ रोजी प्रसिद्ध ब्रँड स्ट्रॅटेजिस्ट विकास इंगळे यांच्या व्याख्यानाने झाली.

कार्यशाळेसाठी प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, ग्रंथपाल प्रा. रमाकांत नवघरे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान समन्वयक डॉ. एस. एन. वाजेकर तसेच ग्रंथालयातील इतर कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यशाळेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर तसेच संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे विशेष कौतुक केले.





**पनवेल : अंत्योदय संकल्पनेचे जनक पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त माजी नगरसेवक नितीन पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात अभिवादन करण्यात आले. यासोबतच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मन की बात कार्यक्रम भाजप पदाधिकाऱ्यांनी पाहिला. या वेळी भाजप सोशल मीडिया सेलचे शहर संयोजक प्रसाद हनुमंते, सहसंयोजक मनोज पाटील, सचिन नाझरे, महेश सरदेसाई, विजय डिसोझा, प्रसाद कंधारे, अनिकेत जाधव, राजा चव्हाण, राजू सावंत, परेश बोरकर, अभिजित दातार व प्रभाग क्रमांक १८मधील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.**



**उलवे नोड : येथील सेक्टर १९ भाजप कार्यालयामध्ये अंत्योदय संकल्पनेचे जनक पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. या वेळी वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे, नामदेव ठाकूर, संतोष तुडमे, प्रणय कोळी, अलंकार म्हात्रे, दीपक गोंधळी, मोराडे, शिंदे, निलेश खोत, नंदु ठाकूर, प्रिया शिंदे, नायडू मॅडम, प्रवीण ठाकूर, वनिता बाबर, छाया चौधरी, सुचिता कबाडे, प्रिती चंदेल आदी उपस्थित होते.**

## संपादकीय

# देशद्रोही फुत्कार

दहशतवाद्यांशी संबंधाचा आरोप असलेल्या पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया या संघटनेच्या कार्यकर्त्यांनी पुण्यात 'पाकिस्तान जिंदाबाद'च्या घोषणा दिल्या. त्यामुळे राज्यातील वातावरण तापले आहे. 'पीएफआय'वर कारवाई झाल्यामुळे या संघटनेच्या कार्यकर्त्यांनी एकवेळ यंत्रणांविरोधात आगपाखड केली असती तर समजू शकले असते, पण पाकिस्तानचा जयघोष करणे म्हणजे देशद्रोह नव्हे तर काय...

**राष्ट्रीय तपास यंत्रणा (एनआयए) आणि सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) दहशतवाद्यांशी संबंध असल्याच्या आरोपाखाली पीएफआय अर्थात पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडियाविरोधात देशभर कारवाई केली. देशातील वेगवेगळ्या राज्यांत गुरुवारी एकाच दिवशी छापे टाकून शंभरहून अधिक पीएफआय कार्यकर्त्यांची धरपकड करण्यात आली. यामध्ये महाराष्ट्रातील २०पेक्षा जास्त जणांचा समावेश आहे. यानंतर दुसऱ्या दिवशी या संघटनेचा महाराष्ट्र अध्यक्ष शेख नासीर शेख साबेर उर्फ नदवी यालाही अटक करण्यात आली. न्यायालयाने त्याला २ ऑक्टोबरपर्यंत कोठडी सुनावली आहे. एनआयए आणि ईडी यांनी केलेल्या कारवाईविरोधात शुक्रवारी पुण्यात पीएफआय संघटनेकडून आंदोलन करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर आंदोलन करणाऱ्या पीएफआयच्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते. त्यानंतर काही आंदोलकांनी चक्क 'पाकिस्तान जिंदाबाद', 'नारा ए तकबीर, अल्लाह हू अकबर' अशा घोषणा दिल्या. यावरून यांची मजल कुठवर गेलेली आहे याची कल्पना येऊ शकते. ही तिच संघटना आहे ज्यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पाटणा येथील रॅलीला लक्ष्य करण्याची योजना आखली होती. केरळमधून पीएफआय सदस्य शफीक पायथ याला ताब्यात घेतल्यानंतर अनेक धक्कादायक गोष्टी उघड झाल्या आहेत. या वर्षी १२ जुलै रोजी झालेल्या पंतप्रधान मोदींच्या पाटणा येथील रॅलीला लक्ष्य करण्याचा पीएफआयचा कट होता. एवढेच नव्हे, तर भारतात वेगवेगळ्या ठिकाणी स्फोट घडवून आणण्यासाठी पीएफआयतर्फे घातक शस्त्रे आणि स्फोटके गोळा केली जात होती, असे ईडीच्या तपासातून समोर आले आहे. मागील काही वर्षांपासून पीएफआय आणि या संघटनेशी संबंधित असलेल्या संस्थांच्या खात्यामध्ये १२० कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत. यातील काही रक्कम देशातील तसेच काही परदेशी संशयास्पद स्रोतांकडून आली होती, जी देशात दहशतवादी कृत्ये तसेच दंगली घडवण्यासाठी वापरण्यात येत होती, असाही दावा ईडीने केला आहे. यातून पीएफआयचा देशविघातक उद्देश स्पष्ट होतो. पाकधार्जिण्या घोषणेनंतर तर यांच्या देशद्रोही कारवायांवर आपसुकच शिक्कामोर्तब झाले आहे. सुदैवाने देशात तसेच महाराष्ट्रात सक्षम, कणखर सरकार आहे. राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमीत असले नारे अजिबात सहन केले जाणार नाहीत, असा इशारा दिला आहे, तर उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आरोपी कुठे असतील तिथून त्यांना शोधून काढून कारवाई केली जाईल, अशा शब्दांत पुढील संकेत दिले आहेत. त्यामुळे देशद्रोह्यांनो खबरदार! असे पुन्हा कराल, तर तुमची खैर नाही. शिवाय एवढाच जर पाकिस्तानचा पुळका तुम्हाला आला असेल, तर इथून चालते व्हा! तुमची भारताला काहीएक गरज नाही. आमचा देश महान होता, आहे व यापुढेही राहील!**

# रायगड जिल्ह्यात शेतीमध्ये नवनवीन प्रयोग

**खबरबात**
संतोष पेरणे





शेती हे रायगड जिल्ह्याचे मुख्य रोजगाराचे साधन होते. मात्र कालानुरूप जिल्ह्यात झालेले औद्योगिककरण आणि तरुण शेतकरी शेतात उतरण्यास तयार नसल्याने शेती करणे कठीण होऊन बसले आहे. या पार्श्वभूमीवर विविध उपाययोजनांही पुढे येत आहेत.

शेतीची कामे पूर्वी अख्खे कुटुंब आपल्या उदरनिर्वाहाचे साधन म्हणून करीत होता. मात्र कालानुरूप कुटुंबे विभागली गेली आणि पूर्वी शेतात भाताची कामे करण्यासाठी जी १५-२० माणसे एकावेळी दिसायची ते बंद झाले आहे. तरुण मुले शिकली आणि नोकऱ्या करू लागली. त्यामुळे घरातीलच नेहमी हातात असलेला मजूर माणूस कमी झाला. त्यात दुभंगलेली कुटुंबे ही देखील शेतीसाठी येणारा खर्च लक्षात घेऊन शेती ओसाड सोडू लागली. एकाच वेळी शेतकऱ्यांवर घरातील काम करण्यासाठी मिळू लागलेली कमी माणसे, त्यानंतर घरातील तरुण नोकरी करण्यासाठी जाऊ लागल्याने त्यांची कमतरता यासर्व बाबी भाताचे कोठार असलेल्या जिल्ह्यातील शेती कमी होण्याची मुख्य कारण बनले आहे. मात्र या गोष्टी भाताची शेती कमी होण्यास कारणीभूत नाही, तर बाहेरून पैसे देऊन मजूर घेऊन करावी लागणारी शेतीदेखील दिवसेंदिवस महाग बनत चालली आहे. जिल्ह्यातील शेती राहिलेल्या कर्जत, खालापूर, पेण या तालुक्यात मोठ्या प्रमाणात नागरीकरण होत आहे. त्यामुळे तेथे जाऊन शेतात मजूर म्हणून येणारा कामगार चार पैसे जास्त कमावू लागला आहे. त्यामुळे तेथे मिळणारे महिन्याचे मानधन हे शेतात कधीतरी राबून मिळत नसल्याने भाताची शेतीमध्ये काम करण्याचा कल कमी झाला. त्याचवेळी त्याचा थेट परिणाम जिल्ह्यात शेती कमी होऊ लागली यात झाला आहे. आदिवासी आणि गरीब कुटुंबातील कामगार शेतीसाठी मिळायचे, मात्र त्यांचे शेतात काम करण्याचे दर पाहिले की शेती ही न परवडण्यासारखी बनली आहे. भाताची शेती कमी होण्यात मजुरांच्या मजूरीचे वाढलेले दर हे कारणीभूत आहेत. कारण शेतात काम करणारा मजूर हा एकावेळी अनेक शेतकऱ्यांकडून मजुरीचे पैसे आगाऊ घेऊन बसलेला असतो. त्यावेळी तो ज्यावेळी काम असतो, तेव्हा आणखी वेगळ्या शेतकऱ्याकडे गेलेला असतो. त्यामुळे पैसे देऊन देखील अजून हाताशी मिळत नसल्याने शेतीची कामे सामान्य कुटुंबातील आणि ज्या शेतकऱ्याकडे घरात माणसे कमी आहेत, त्यांना तर शक्य होत नाही. ही स्थिती प्रत्येक शेतकऱ्यांना सतावत असून आता भाताचे शेत ओसाड जाण्यास सुरुवात झाली आहे. या परिस्थितीत शेती करणारे शेतकरीदेखील मोठ्या प्रमाणात आहेत, ज्यांनी अद्ययावत अवजारे यांची कास धरली आहे. ज्यांनी प्रयोगशील शेती सुरू केली आहे. त्यांनी आपली शेती टिकवून ठेवण्यासाठी विज्ञानाची धरलेली कास ही देखील महत्वाची बाब आहे. त्यामुळे भाताची शेती परवडत नसताना देखील केली जात असून भाताचे कोठार राहिलेल्या जिल्ह्यात भातशेते ओसाड जाण्याचे प्रमाण बघून अनेक जुने ज्येष्ठ शेतकरी हळहळ व्यक्त करताना दिसत आहेत. या सर्व स्थितीत शेती करताना पॉवर ट्रीलर, ट्रॅक्टर अशी मशागतीचे अवजारे बाजारात आली असून त्यांचा वापर देखील शेतकरी करताना दिसत आहे. काही शेतकऱ्यांनी आता समूह शेतीकडे आपला कल सुरू केला आहे. त्यात गावोगावचे शेतकरी हे समूह म्हणून एकत्र येतात आणि शेती पहिल्या दिवसांपासून मळणी होईपर्यंत समूहाने करताना दिसतात. समूह शेतीचा फायदा देखील होताना दिसत असून त्यामुळे एकावेळी दहा कुटुंबे एकत्र येऊन शेतीची कामे करणार असतील तर मग मजुरी देऊन मजूर घेण्याची वेळ कमी प्रमाणात त्या-त्या शेतकरी कुटुंबावर येणार आहे. काही भागात गावागावात वडकई पद्धतीने दहा ते पंधरा शेतकऱ्यांच्या समूहाच्या गटाने आळीपाळीने एकमेकांच्या शेतांमध्ये लागवड केली जाते. ही पद्धत ही कमी होत चालली आहे. यामध्ये ज्या शेतकऱ्यांकडे भात लागवड असेल त्या शेतकऱ्यांने दोन वेळच्या जेवणासह सर्व पड़कई दारांची व्यवस्था केली जाते. त्यामुळे भात लागवड वेळेत होते. त्यामूळे मजुरांची होणारी टंचाई दूर होते. सध्या शेतकरी आपल्या कुटुंबासह भात लागवडीत मग्न झाला आहे. अनेक शेतकऱ्यांनी जनावरे विकली असल्याने अनेकांना नांगर जोड़ी मिळत नाही. भात लावणी करण्यास त्यांना वेळ लागतो त्यामुळे अनेकजन नांगरणी करण्यासाठी बैल जुंपलेले नांगर देखील दिसत असून त्यातून भाताचे कोठार असलेल्या जिल्ह्यातील हे समूह शेतीचे चित्र आशादायी ठरत आहे.

कृषिरत्न शेतकरी शेखर भडसावळे यांनी शेतकऱ्यांचे श्रम कमी करण्यासाठी सगुणा राईस टेक्निक म्हणजे एसआरटी ही पद्धती शोधून काढली. त्यांच्या या एसआरटी शेती पध्दतीमुळे राज्यातील शेतकऱ्यांना मोठा हातभार मिळाला असून राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात आता एसआरटी पद्धतीने शेती केली जात आहे. दरम्यान, राज्यातील अनेक शेतकरी आता एसआरटी पद्धतीने भाताची शेतीसह अन्य दोन पिके वर्षभरात घेऊ लागली आहेत. शेखर भड़सावळे आणि त्यांच्या टीमने २०११मध्ये सगुणाबाग राईस टेक्निक शोधून काढली. त्याआधी अनेक वर्षे शेखर आणि त्यांचे सहकारी भाताच्या नवीन जाती विकसित करण्यात आघाडीवर आहेत. जास्त उत्पादन देणाऱ्या भाताच्या अनेक जाती विकसित केल्या आहेत. त्या प्रत्येक वेळी शेतात वर्षातून दोनदा पीके घेण्यासाठी ते ट्रॅक्टरच्या सहाय्याने नांगरणी करायचे. त्याचवेळी मजूर शोधून लावणी तसेच मशागत करावी लागत असल्याने शेखर आणि त्यांच्या सहकारी यांनी नवीन काही तरी उपाय शोधले पाहिजेत याची वारंवार चर्चा केली. त्यातून एसआरटी जन्माला आली. सगुणाबाग राईस टेक्निक म्हणजे नांगरणी न करता शेतात पीके घेण्याची पद्धत. सगुणा रूरल फाउंडेशनच्या माध्यमातून एक लोखंडी अवजार विकसित करण्यात आले. त्याच्या सहाय्याने एकदा वाफे पाडल्यानंतर पुन्हा चार-पाच वर्षे कोणतेही नवीन वाफे पाडण्याची गरज लागणार नव्हती. त्याचवेळी वेळेवर कीटक नाशक यांची फवारणी, पाण्याचे नियोजन केल्यास वर्षातून किमान तीन पीके घेता येणे या पध्दतीत सहज शक्य होते. या पद्धतीचा अवलंब राज्यातील असंख्य शेतकरी करू लागले. त्यानंतर राज्य सरकारच्या कृषी विभागाने शेत जमिनीची धूप थांबते आणि शेतकऱ्यांचे श्रम देखील कमी होतात हे सिद्ध केले आणि त्यात राज्य सरकारने आपले कृषी अधिकारी यांच्या माध्यमातून प्रसार देखील सुरु केला. त्याचवेळी एसआरटी पद्धतीला शासनाच्या यादीत समावेश केल्याने कर्जत तालुक्यात हे तंत्र विकसित झाल्यानंतर त्याचा या भागातील शेतकऱ्यांनी स्वीकार केला. जिल्ह्यात किमान १००० शेतकरी एसआरटी पद्धतींने भाताची शेती करीत आहेत.



## बदलते तंत्रज्ञान

# स्मार्टफोन वापरकर्त्यांनी नेहमी 'हे' लक्षात ठेवावे!



आज स्मार्टफोन हा आपल्या आयुष्याचा महत्त्वाचा भाग बनला आहे. देशात करोडो लोक स्मार्टफोन वापरतात. गेल्या काही वर्षांत सायबर गुन्ह्यांशी संबंधित घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे. हे लक्षात घेऊन सरकारने स्मार्टफोन वापरकर्त्यांसाठी एक इशारा जारी केला आहे. सरकारने सर्वोत्तम पद्धतींबाबत सल्लागार जारी केला असून इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत असलेल्या इंडियन कॉम्प्युटर इमर्जन्सी रिस्पॉन्स टीमने स्मार्टफोन वापरकर्त्यांसाठी ही सूचना जारी केली आहे. स्मार्टफोनवर अ‍ॅप डाउनलोड करताना वापरकर्त्यांनी काय करावे आणि काय करू नये याबद्दल यामध्ये त्यांनी सांगितले आहे. जाणून घेऊया सविस्तर माहिती.

गाईडलाइनमध्ये स्मार्टफोन वापरकर्त्यांना अ‍ॅप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी अधिकृत गुगल प्ले स्टोअर अ‍ॅप वापरण्यास सांगण्यात आले आहे. असे केल्याने स्मार्टफोनमध्ये स्पायवेअर किंवा व्हायरस असलेले अ‍ॅप येण्याची शक्यता खूप कमी होईल. अ‍ॅप्लिकेशन डाऊनलोड करताना त्या अ‍ॅपचे तपशील, यूजर रिव्ह्यू, डाउनलोड्सची संख्या इत्यादीकडे विशेष लक्ष द्या. तुमच्या स्मार्टफोनवर कोणतीही अनधिकृत वेबसाइट ब्राउझ होणार नाही याची विशेष काळजी घ्या. याशिवाय स्मार्टफोनवरील कोणत्याही अवांतर एसएमएस किंवा ईमेलवर पाठविलेल्या लिंकवर क्लिक करू नका.

तुम्ही त्या युआरएलवर क्लिक केले पाहिजे जे वेबसाइट डोमेन स्पष्टपणे दर्शवतात तुम्ही तुमचा स्मार्टफोन वेळोवेळी अपडेट करत राहावे. असे केल्याने तुमच्या मोबाईलमध्ये सिक्युरिटीशी संबंधित नवीन पॅच येतात. यामुळे स्मार्टफोनला सुरक्षेचा अतिरिक्त स्तर मिळतो. तुमच्या स्मार्टफोनवर कोणतीही अनधिकृत वेबसाइट ब्राउझ होणार नाही याची विशेष काळजी घ्या. तुम्ही तुमचा स्मार्टफोन वेळोवेळी अपडेट करत राहावे, असे केल्याने तुमच्या मोबाईलमध्ये सिक्युरिटीशी संबंधित नवीन पॅच येतात. यामुळे स्मार्टफोनला सुरक्षेचा अतिरिक्त स्तर मिळतो. स्मार्टफोन वापरताना सुरक्षित ब्राउझिंग करावे.

# समर्थ रामदासस्वामींचे शारदास्तवन

**निमित्त**



आताच सर्वांना आनंद प्रदान करणारा गणेशोत्सव पार पडला. गणेश ही ज्ञानाची, बुद्धीची देवता आहे. गणपती ज्ञान स्वरूप तर शारदा शक्ती स्वरूप आहे. दासबोधात शारदास्तवन या समासात शारदेचे वर्णन समर्थांनी सुंदररित्या व्यक्त केले आहे.

आता नवरात्र उत्सव सुरू होत आहे. शारदा, सरस्वती जगदंबा, लक्ष्मी, कालिका, भवानी या अनेक नावांनी भक्त तिला संबोधतात. वेदांची माता श्री शारदा आहे. ब्रह्माची कन्या आहे. वाणीची देवता आहे. चार प्रकारच्या वाणी आहेत. परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी. शब्द जेथून उमटतो ती परावाणी नाभिस्थानी आहे. शेवटी वैखरी म्हणजे प्रत्यक्ष वाचेद्वारे शब्दांचे प्रकटीकरण होय. हे सर्व शारदेमुळे घडते.

**महापुरुषाची भार्या।**
**अति संलग्न अवस्था तुर्या।**
**जे ईश्वराची निजशक्ती।**
**जे ज्ञानियांची विरक्ती।**

ही महामाया आहे. ईश्वराची शक्ती आहे. ती सर्वसाक्षिणी आहे. सृष्टीमध्ये अनंत घडामोडी रोज होतात. सहज लीलेने ती हा खेळ खेळते, घडवते आणि मोडतेही. ती माया आहे. तिचा पार ब्रम्हादिकांनाही लागत नाही. अतिशय सुंदर लावण्यवती ती आहे.

**लावण्यस्वरूपाची शोभा।**
**परब्रम्ह सूर्यासी प्रभा।**

लावण्यखाणी असे समर्थ म्हणतात. अव्यक्त परब्रम्हाची व्यक्त झालेली शक्ती शारदा आहे. भवसिंधूचा पैलपार। पाववी शब्दबळे। साहित्यिक, नाटककार यांना शब्दस्फुरण देणारी श्री शारदा आहे. काव्यातून, संगितातून मधुर ध्वनी निघतात त्याचे मूळ शारदेत आहे. संतांच्या अंतःकरणात स्फूर्तीचा झरा अखंड वाहत असतो, कारण शारदा त्यांच्यावर प्रसन्न असते. संत निस्पृह, ज्ञानी, विरागी असतात. म्हणून तर संतांचे साहित्य, काव्य अमर आहे, मधुर आहे. काळजाला भिडते. आजही ज्ञानेश्वरी, दासबोध, रामायण, तुकाराम महाराजांची गाथा लोकांना भावते. अनेक वर्षे गेली तरी काव्य चिरंतन आहे, कारण शारदाच त्यांच्याकडून हे काव्य लिहून घेते. संत तिचेच कर्तृत्व मानतात. शारदा परमार्थाचे मूळ आहे.

**योगियांचे ध्यानी। साधकांचे चिंतनी।**
**सिद्धांचे अंतःकरणी। समाधी रूपे।**

योगी लोकांच्या ध्यानीमनी ती असते. समाधी व्यवस्था तिची अवस्था आहे. सर्व व्यापक ती आहे. सर्वांघटी ती आहे म्हणून घट बसले. कारण घट हे प्रतीक आहे.

**शास्त्र पुराणे वेद श्रुती।**
**अखंड जयेचे स्तवन करिती।**
**नानारूपी जयेसी स्तवीती। प्राणीमात्रा।**

वेदशास्त्र तिचे स्तवन करतात. शब्दाने ती प्रगट होते. कालिदासांनी तिचीच उपासना केली, म्हणून ते श्रेष्ठ कवी ठरले. आज जे श्रेष्ठ गायक, गायिका आहेत, कवी आहेत. व्यास ,वाल्मिकी यांना शारदेचा वरदहस्त आहे. जाणीव रूपाने तिचा संचार आहे. इच्छाशक्ती, ज्ञान शक्ती, क्रीया शक्ती या सर्व शक्ती त्या जगदंबेच्या आहेत. श्री ज्ञानेश्वर माऊली वर्णन करते.

**आता अभिनव वाग्विलासिनी।**
**जे चातुर्यार्थकलाकामिनी।**
**ते श्रीशारदा विश्व मोहिनी।**
**नमिली मियां।**

सर्व विश्वाला ती मोहून टाकते. प्रभू रामचंद्रांना राज्याभिषेक होणार असे कळल्यावर देव भयभीत होतात. मंथरेच्या वाणीतून ती प्रकटते. याबरोबरच रामाला शक्ती देण्यासाठी ही नऊ दिवस घटी बसली.

**-उज्ज्वला भावे, खोपोली**

**क्लिक...क्लिक...!**

(छाया : अमेय नाझरे)



**श्रीवर्धन : सूर्यास्ताच्या वेळी दिवेआगर समुद्र किनाऱ्यावर आसमंतात निर्माण झालेल्या रंगछटा पर्यटकांचे विशेष लक्ष वेधून घेतात.**

## आरोग्य प्रहर

# गरम पाणी 'अशा प्रकारे' पीत असाल तर व्हा सावध!

काही लोक सकाळी उठल्यानंतर कोमट पाणी पितात. जर तुम्ही जास्त गरम पाणी प्यायले तर त्याचा तुमच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतो. आजकाल एसी ऑफिसमध्ये काम करताना सतत गरम पाणी पिण्याला जास्त महत्त्व दिले जाते. तसेच तुम्ही हे ऐकले असेल की बरेच लोक वजन कमी करण्यासाठी आणि त्वचेच्या समस्यांपासून मुक्त होण्यासाठी गरम पाणी पितात.



याशिवाय सर्दी टाळण्यासाठी गरम पाणी प्या. त्याच वेळी, काही लोक सकाळी उठून गरम पाणी पिण्याचा सल्ला देतात. पण खरोखरच गरम पाणी पिण्याचे अनेक फायदे आहेत का? पण गरम पाणी पिण्याचे जितके फायदे आहेत तितकेच तोटेही आहेत. जर जास्त गरम पाणी प्यायले तर आरोग्यावर वाईट परिणाम होतो. तहान लागल्यावर गरम पाणी प्यायल्याने तुमच्या एकाग्रतेवर परिणाम होतो, असे अनेक अभ्यासातून दिसून आले आहे. खूप गरम पाण्यामुळे मेंदूच्या पेशींना सूज येऊ शकते. यामुळे मानसिक समस्या उद्भवू शकतात. गरम पाणी पिण्यानेही किडनीचा त्रास होऊ शकतो. मूत्रपिंडात एक विशेष केशिका प्रणाली असते. यामुळे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, गरम पाण्यामुळे किडनीवर जास्त दबाव पडतो. याचा त्यांच्यावर वाईट परिणाम होऊ शकतो. खूप गरम पाण्याचा पचनसंस्थेवरही वाईट परिणाम होतो. त्याचा परिणाम आतड्यांवरही होतो. ज्या लोकांना आतड्यांसंबंधी समस्या आहेत त्यांनी गरम पाणी पिणे टाळावे. याशिवाय गरम पाण्यामुळे तोंडात अल्सर होऊ शकतो. गरम पाणी प्यायल्याने अनेक गंभीर समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे मेंदू आणि श्वसनाचे आजार होऊ शकतात. खूप गरम पाणी प्यायल्याने श्वास घेण्यास त्रास होतो. मात्र, रिकाम्या पोटी एक ग्लास कोमट पाणी प्यायल्याने तुमची पचनक्रिया व्यवस्थित राहते. रोज सकाळी पाणी पिण्याची सवय लावल्यास गॅस आणि पोटफुगीच्या समस्येपासून आराम मिळतो.

शरीरातून विषारी पदार्थ देखील काढून टाकले जातात. याशिवाय जर तुम्हाला डोकेदुखीची समस्या असेल तर रोज सकाळी रिकाम्या पोटी कोमट पाणी प्या. वास्तविक, डोकेदुखी शरीरात पाण्याच्या कमतरतेमुळे होते. त्यामुळे भरपूर पाणी प्या. आणि दररोज सकाळी एक ग्लास कोमट पाण्याने दिवसाची सुरुवात करा. दरम्यान येथे देण्यात आलेली माहिती सामान्य, प्राथमिक ज्ञानावर आधारित आहे. यासाठी आरोग्य तज्ज्ञांचा वेळीच सल्ला घ्यावा.

# शाळांमध्येही शारदोत्सवाची लगबग

## भोंडला, नाचाच्या फेऱ्यांसह विविध उपक्रम



पाली : प्रतिनिधी

नवरात्रोत्सव म्हटले की, नऊ दिवस सर्वांच्याच आनंदाला उधाण येते. गावागावात घटस्थापनेच्या दिवशी देवी बसतात. त्याचप्रमाणे जिल्ह्यातील बहुसंख्य शाळांमध्येदेखील घटस्थापनेला सरस्वती मातेच्या रूपाने देवी बसविली जाते.

कोरोनानंतर दोन वर्षांनी शाळेत हे उपक्रम राबविले जात आहेत. नऊ दिवस शाळेत उत्साही व प्रसन्न वातावरण असते. गरबा, हादगा किंवा भोंडला, नाचाच्या फेऱ्या याबरोबरच विविध कार्यक्रमदेखील शाळेत जोरदार राबविले जातात. सध्या जिल्ह्यातील शाळांमध्ये नवरात्रोत्सवाच्या तयारीला सुरुवात झालेली पाहायला मिळत आहे. विद्यार्थी आणि शिक्षकांमध्येदेखील तयारीची लगबग दिसत आहे.

शाळा-शाळांमध्ये साफसफाईला सुरुवात झाली आहे. शाळेतील विद्यार्थी व शिक्षकही साफसफाई करताना दिसत आहेत. शाळेतील एका वर्गखोलीत लाकडी तयार देव्हाऱ्यात सरस्वतीची मूर्ती ठेवून तिची मनोभावे प्राणप्रतिष्ठा केली जाते. काही ठिकाणी वर्गखोल्या रंगवण्याची कामेदेखील सुरू आहेत, तर काही शाळांमध्ये देवी ठेवणाऱ्या वर्गखोलीची रंगरंगोटी करणे, पताके लावणे, रंगीत कागद चिकटवणे, सजावट करणे अशा प्रकारची कामे विद्यार्थी व शिक्षक करतांना दिसत आहेत. याबरोबरच सामानाची आवरा आवर करणे विविध वस्तू योग्य ठिकाणी लावणे देवी बसवण्याच्या ठिकाणी विद्युत रोशनाई करणे आदी कामेदेखील सुरू असलेले पाहायला मिळत आहेत.

या नऊ दिवसांमध्ये कोणी कोणी कोणती कामे करायची कशा प्रकारे रोजचे कार्यक्रम राबवावेत, अशी विद्यार्थ्यांची नियोजने देखील सध्या सुरू असलेली पाहायला मिळत आहेत. एवढेच काय आदिवासी वाड्या पाड्यांवरील शाळेतदेखील नवरात्रोत्सवाची ही लगबग पाहायला मिळत आहे. विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये एक वेगळाच उत्साह आणि जोश पहायला मिळत आहे. दरवर्षी आवर्जून सर्व विद्यार्थी व शिक्षक शारदोत्सवाची वाट पाहत असतात.



### नऊ दिवस कार्यक्रमांची जंत्री

*बहुतांश शाळेत नऊ दिवस शाळेच्या परिपाठावेळी देवीची आरती म्हटली जाते. शाळेच्या बाहेर वर्गात आकर्षक रांगोळीदेखील काढली जाते. आरतीचा मान दर दिवशी प्रत्येक वर्ग आणि विद्यार्थ्यांना दिला जातो. देवीसाठी हार-फुले, पुजेचे व साहित्याची जबाबदारीसुद्धा शिक्षक पालक व मुले वाटून घेतात. काही शाळांमध्ये पालकांसाठी नऊ दिवस देवीच्या नऊ रुपांची माहिती दिली जाते. यातील एक दिवस स्पेशल गरबा खेळाला जातो, एक दिवस भोंडला किंवा हादगादेखील होतो.*

**दोन वर्षांनंतर घटस्थापनेची तयारी सुरू आहे. वर्गखोल्यांची साफसफाई करून आता देवी बसणाऱ्या वर्गात सजावटीचे काम सुरू आहे. नऊ दिवस विद्यार्थी व पालकांसाठी विविध कार्यक्रम राबवले जातात, काही पालक नऊ दिवस विद्यार्थ्यांसाठी खाऊचे वाटपदेखील करतात. नऊ दिवस अभ्यासाबरोबर मनोरंजन आणि सणदेखील मनोभावे साजरा केला जातो.**

**-अमोल जंगम, मुख्याध्यापक, आदर्श प्राथमिक विद्यामंदिर,**

**नवरात्रोत्सव व शारदोत्सव हा राजिप शाळेत दरवर्षी नवरंगप्रमाणे विविध उपक्रमांच्या माध्यमातून साजरा होत असतो. यामध्ये हादगा, भोंडला हा विशेष असतो. वाडी वस्तीवरील मुलामुलींसाठी नवरंगात नटून येऊन फेर धरायला लावणारा दांडिया, टिपऱ्या व गरबा याचा आनंद पहायला मिळतो. शाळेतील वातावरण यामुळे उर्जात्मक व आनंददायी राहते.**

**-राजेंद्र अंबिके, उपशिक्षक, राजिप शाळा नेणवली, सुधागड**

**शाळेत खूप छान कार्यक्रम होतात. आम्हा लहान मुलींना साडी नेसून नटून-थटून येऊन गरबा खेळायला खूप आवडते. भोंडल्याच्या वेळी विविध खाऊ मिळतो. सर्व मुले नवरात्रोत्सवात शाळेत खूप मजा करतो.**

**-प्रिया पाटील, विद्यार्थिनी**

# मंदिरात चोरी करणाऱ्या चोरट्यास अटक

## गुन्हे अन्वेषण विभागाची कारवाई



पेण : प्रतिनिधी

खरोशी येथील केळंबादेवी मंदिर व खारपाडा येथील शिवाई मंदिरात झालेल्या चोरीप्रकरणी गुन्हे अन्वेषण विभागाने आरोपी गुरुनाथ तुकाराम वाघमारे (वय ४७ रा. खैरासवाडी, खारपाडा) याला अटक केली आहे.

काही दिवसांपूर्वी चोरट्याने खरोशी येथील केळंबादेवी मंदिर व खारपाडा येथील शिवाई माता मंदिरात दानपेटी फोडून रोख रक्कम लंपास केली होती.चोरटा हा सीसीटीव्ही फुटेजमध्ये कैद झाला होता. याप्रकरणी पेण पोलीस ठाणे व दादर सागरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या चोरीचा तपास स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग अलिबाग यांच्याकडे देण्यात आला. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तसेच स्थानिकांकडून माहिती घेत आरोपी गुरुनाथ तुकाराम वाघमारे याच्यावर पाळत ठेवून खैरासवाडी येथून ताब्यात घेतले. त्याला पोलिसी खाक्या दाखविला असता त्याने गुन्हा कबूल केला. गुन्हेगाराकडून चोरी केलेले पाच हजार ९०५ रुपये रोख रक्कम, स्टीलची दानपेटी, पुजेचे तांब्याचे ताट व तांब्या ही सर्व मालमत्ता हस्तगत केली असून चोरीत वापरलेले लोखंडी टिकाव व पहार ताब्यात घेण्यात आली आहे.

# खालापुरात विजेच्या झटक्याने दोन बकऱ्या ठार



खोपोली : प्रतिनिधी

वनवे येथे विजेचा झटका बसल्याने दोन बकऱ्यांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

खालापूर नगरपंचायत हद्दीत असलेल्या वनवे गावातील शेतकरी प्रकाश जोगावडे यांचा बकरी पालनाचा जोडधंदा आहे. पावसाळ्यात वाढलेला हिरवा चारा चरण्यासाठी बकऱ्या वनवे गावातील गायकवाड यांचे घर असलेल्या परिसरात गेल्या होत्या. काही बकऱ्या घरी परत आल्या, परंतु दोन बकऱ्या कुठे राहिल्या हे पाहण्यासाठी गुराखी गेला असताना त्याला दोन बकऱ्यांचा मृत्यू झाल्याचे आढळून आले. बकऱ्यांच्या पायात विद्युत तार अडकल्याचे लक्षात आल्यानंतर विजेचा झटका लागून बकऱ्यांचा मृत्यू झाल्याचे समजले.

याबाबत तातडीने महावितरण अभियंता सचिन धनुधर्मी यांना कळविण्यात आले. त्यांनी घटनास्थळी भेट दिली. आकडा टाकून घेण्यात येत असलेली वीज चोरीमुळे सदरची दुर्घटना घडल्याचे लक्षात आल्याने वीज चोरीसाठी वापरण्यात आलेली जवळपास ५० मीटर तार महावितरण अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी जप्त केली. महावितरण अधिकारी आणि शेतकरी यांनी खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

# रसायनीत लम्पी आजाराने बैलाचा मृत्यू

खोपोली : प्रतिनिधी

लम्पी रोगाचा प्रादूर्भाव तालुक्यात झपाट्याने वाढत असून रसायनी हद्दीतील वडगाव येथील शेतकरी संतोष ठोंबरे यांच्या बैलाचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे.

खालापूरलगत कर्जत तालुक्यात लम्पी आजाराने ग्रस्त गुरे सापडल्यानंतर विशेष काळजी खालापूर तालुक्यात घेण्यात येत होती, मात्र असे असतानादेखील वडगाव येथील शेतकरी संतोष दत्तात्रय ठोंबरे यांच्या १४ महिन्यांच्या बैलाचा लंपी आजाराने मृत्यू झाला आहे. तालुक्यात १२ हजारांच्या आसपास पशुधन आहे. दुभत्या जनावरास लम्पी रोगाची लागण झाल्यास त्याचा मोठा आर्थिक फटका बळीराजाला जाणवत आहे. त्यामुळे लम्पी आजाराने बैलाचा मृत्यू झाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

तालुक्यात लसीकरण मोहिमेला वेग आला असून रविवारी सुट्टीच्या दिवशीदेखील पशुवैद्यकीय अधिकारी आणि कर्मचारी कामावर हजर होते.

# पं. दिनदयाळ उपाध्याय जयंतीनिमित्त आरोग्य शिबिर

## भाजपतर्फे सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत आयोजन





पेण : प्रतिनिधी

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवडा व पंडित दिनदयाळ उपाध्याय जयंतीनिमित्त भाजप, पेण उपजिल्हा रुग्णालय व जिल्हा रुग्णालय अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने शिर्की येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर झाले. सुरुवातीस भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांच्या हस्ते पं. दिनदयाळ उपाध्याय व भारतमातेच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला.

उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांनी, डॉक्टरांना २१व्या शतकातील देव म्हणून संबोधले जाते. आपल्याला कोरोना काळात याची प्रचिती आली आहे. शहरी भागातील नागरिकांच्या आरोग्य तपासणीच्या दृष्टीने ग्रामीण भागातील जनतेला अपुऱ्या सोयीसुविधा उपलब्ध असतात. हिच बाब गृहीत धरून मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, असे त्यांनी सांगितले.

या वेळी शिर्की सरपंच धनश्री गणेश पाटील, मसद सरपंच बळीराम भोईर, उपसरपंच प्रवीण पाटील, व्यापारी सेलचे अध्यक्ष हेमेंद्र जैन, तंटामुक्ती अध्यक्ष शेखर पाटील, सोशल मिडिया अध्यक्ष सदाशिव म्हात्रे, उपसरपंच माई म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य सविता गावंड, दत्ताराम पाटील, प्रियंका पाटील, आकाश म्हात्रे, राजाराम गावंड, चंद्रकांत पाटील, रमेश पाटील यांच्यासह डॉ. निकम मॅडम, डॉ. पल्लवी पाटील, डॉ. कामिनी मोकल, डॉ. राम शिंदे यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

शिबिराचा लाभ घेण्यासाठी खारेपाट विभागातील शेकडो ग्रामस्थांनी घेतला. ग्रामस्थांनी भाजप आमदार रवीशेठ पाटील, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर तसेच रायगड जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील यांचे आभार मानले.

# चिखलावरून दुचाकी घसरून पाच जण जखमी

## नागोठणे मार्गावरील घटना

पाली : प्रतिनिधी

रिलायन्स टाऊनशीप गेटसमोर वसाहत निर्माणाचे काम सुरू आहे. हा प्रकल्प नागोठणे-पोयनाड मार्गावर सुरू असून बांधकामासाठी लागणारी खडी, माती, वाळू, डबर व इतर साहित्याची वाहतूक या मार्गावरून केली जाते. त्यामुळे या मार्गावर चिखल व खडी पडलेली असल्याने तीन दिवसांत पाच दुचाकीस्वार घसरून जखमी झाले आहेत.

पावसाळयात दुचाकीस्वारांना येथून प्रवास करताना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतोय. येथील कामगारांना ने-आण करणाऱ्या बसेस मुख्य मार्गालगत उभ्या केल्या जात आहेत, त्यामुळे अपघाताची शक्यता वाढली आहे. शनिवारी (दि. २४) सकाळी नितीन पाटील व प्रशांत म्हात्रे दोघे दुचाकी घसरून पडले व जखमी झाले. या मार्गावरून वाहनांची वर्दळ असल्याने चिखल इतरत्र पसरतो, त्यामुळे वारंवार या हद्दीत अपघात घडत आहेत. त्यामुळे दुचाकीचालकांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

गेल्या तीन दिवसांत पाच जण घसरून पडले आहेत. याबाबत वेळीच उपाययोजना कराव्यात; अन्यथा स्थानिक जनता रस्त्यावर उतरेल, असा इशारा देण्यात आला आहे.



**एल अँड टी प्रकल्प हद्दीत कोणतेही अपघात होऊ नयेत यासाठी खबरदारीच्या उपाययोजना केल्या जात आहेत, मार्गावर चिखल पसरू नये यासाठी आवश्यक त्या ठिकाणी कॉंक्रिटीकरण केले जाणार आहे.**

**-सागर भोसले, प्रकल्प व्यवस्थापक, एल अँड टी, नागोठणे**

# म्हसळ्यात ३२ सार्वजनिक, तर २२ खासगी देवी

म्हसळा : प्रतिनिधी

नवरात्रोत्सवाची सुरुवात सोमवारी (दि. २६)पासून होत आहे. घरोघरी घट बसविण्याची तयारी अंतिम टप्प्यात असून बाजारपेठेत खरेदीला झुंबड उडाली होती. तालुक्यात ३२ सार्वजनिक तर २२ खासगी देवींची स्थापना करण्यात येणार आहे.

बहुतांश मंडळांनी परंपरागत ठिकाणी सार्वजनिक घट, दुर्गादेवीचे स्थापनेसाठी परवानगी, स्पिकर परवाना घेतले आहेत, असे पोलिसांनी सांगितले. घटासाठी लागणारे धान्य, माती, पुजेचे साहित्य, फळे खरेदीला बाजारपेठेत ग्राहकांची झुंबड उडाली होती. शहरांतील श्रीराम नवरात्र मंडळ, संतगोरा कुंभार नवरात्र मंडळांचा आणि खरसई, पाभरे, कणघर, मेंदडी येथील प्रत्येकी दोन नवरात्र मंडळ आणि अन्य मंडळांची परिपूर्ण तयारी झाली आहे. शहरांतील ग्रामदेव श्री धावीर देव मंदीर परिसर अध्यक्ष समीर करडे, गौरव पोतदार या मंडळाचे कार्यकर्त्यांनी स्वच्छ केला आहे,

श्री धावीर देव मंदिरात, महिला मंडळांनी हळदी कुंकू कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. पोलिसांनी नवरात्र मंडळांना वाद्य- वाजंत्री, स्पिकरच्या आवाजाची तीव्रता आणि वेळेबाबतचे नियम सांगितल्याचे सुर्यवंशी यांनी सांगितले. स्पिकर रात्री १० वाजेपर्यंत, आवाजाची क्षमता निवासी क्षेत्रांत दिवसा ५५ रात्री ४५ डिसेबल असावा असेही पोलिसांनी सांगितले.

# परतीच्या पावसात धुक्याचे सावट; पहाटेच्या वेळी वातावरणात गारवा



खोपोली : प्रतिनिधी

वातावरण सातत्याने बदल घडत असल्यामुळे नागरिक चांगलेच हैराण झाले आहेत.पहाटे धुके पडत असले तरी, सायंकाळी आकाशात ढग दाटून येत आहे. यामुळे हा पावसाळा म्हणावा की, हिवाळा असा प्रश्न सर्वांना पडला आहे. अशीच स्थिती बळीराजाची झाली आहे. भातशेती उत्तम बहरली असून सायंकाळी होताच बळीराजाच्या तोंडचे पाणी पळत आहे.सकाळी जरी वातावरणात धुके पडत असले तरीसुद्धा गुलाबी थंडी जाणवत नाही. धुक्यामुळे वाट काढणे वाहनचालकांस अवघड जात आहे. सायंकाळी पाऊस पडत असल्यामुळे शेतात तयार झालेल्या धान्याचे नुकसान होण्याची शक्यता आहे.भाताच्या लोंब्यांमध्ये दाणा तयार होण्याच्या मार्गावर आहे, मात्र अशा परिस्थितीत सातत्याने पाऊस पडत असल्याने शेतकऱ्यांना पुन्हा मोठे नुकसान सहन करावे लागणार आहे. असाच जर पाऊस सुरू राहिला तर हाताला भाताचा दाणा मिळणार नाही.दरवर्षी हस्त नक्षत्रांचा पाऊस शेतीचे नुकसान करीत असल्यामुळे, शेती करण्यासाठी बळीराजा पाठ फिरवत आहे, मात्र आपला उदारनिर्वाह शेतीवरच असल्यामुळे शेतीशिवाय पर्याय नाही. पाऊस शांत झाला असता तर भात कापणीस पारंभ झाला असता, मात्र सायंकाळी येत असलेल्या पावसामुळे शेतकरी पुरता हैराण झाला आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**e-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. SE/EHV/ (O&M) /cir/ PNL | Description | Estimated cost in lakhs |
|---|---|---|---|
| 1 | SE/EHV/(O&M)/CIR/ PNL/e-Tender- 40/ 2022-2023 RFX: No. **7000024779** | Procurement of the 33 kV & 22 kV PTs as a spare for utilization for Repair and maintenance activities as and when required under EHV (O&M) Circle,Panvel. | **Rs. 3.46 Lakhs** |

EMD Rs.5000/-. & Tender fee Rs. 500/- + GST **Submission of bids from 26.09.2022 to 03.10.2022 up to 23.59 hrs, Bid opening date and time:- 04.10.2022 at 12:30 Hrs. (Technical) and at 15.00hrs (Commercial)** if possible. For further details visit our website **https://srmtender.mahatransco.in/** **Contact Person:** The Executive Engineer (Adm) Tel. No. 022-27459624/25, Mob.No.9769006220

**Note:** All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER**
**EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

## निवडक

### वीर गुप्ता प्रदेश उपाध्यक्षपदी

**नवी मुंबई :** सामाजिक कार्यकर्ते वीर गुप्ता यांची प्रधानमंत्री जनकल्याणकारी योजना जागरूकता अभियानच्या महाराष्ट्र राज्य प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांना नियुक्तीपत्र अभियानचे राष्ट्रीय अध्यक्ष अनित कौशिक यांनी दिले आहे. गुप्ता यांची नियुक्ती झाल्यावर राष्ट्रीय संघटन मंत्री विजयकुमार चौबे, मुख्य राष्ट्रीय उपाध्यक्ष ईश्वर सिंह नेगी, महेंद्र खटिक, राज आश्रय आदींनी शुभेच्छा दिल्या. गुप्ता हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक कामे करीत असून राज्यात प्रधानमंत्री जनकल्याणकारी योजना विषयी जनतेमध्ये जनजागृती व्हावे यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

### संदेश डोंगरे शहराध्यक्षपदी

**नवी मुंबई :** मनसेच्या विद्यार्थी सेनेच्या नवी मुंबई शहर अध्यक्ष पदी संदेश डोंगरे यांची नियुक्ती मनसे विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित ठाकरे यांच्या आदेशाने करण्यात आलेली आहे. या वेळी नवी मुंबईतील विद्यार्थी, पालक, शिक्षक तसेच शिक्षण संस्था यांच्या प्रश्नांसंबंधी त्यांची सोडवणूक करण्यासाठी मनसेची नवी मुंबई विद्यार्थी सेना कायम कटिबद्ध असेल, असे मत संदेश डोंगरे यांनी व्यक्त केले.

# शेतकर्‍यांसाठी विविध योजना मंजूर

## लाभ घेण्याचे कृषी विकास अधिकार्‍यांकडून आवाहन



**उरण : वार्ताहर, बातमीदार**

कृषी विभाग रायगड जिल्हा परिषदेकडील केंद्र, राज्य पुरस्कृत व जिल्हा परिषदेच्या सन २०२२ २३ सालासाठी सेस योजना शेतकर्‍यांसाठी मंजूर झाल्या आहेत. या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी तालुकास्तरावरील पंचायत समिति कार्यालयातील कृषी अधिकारी, विस्तार आधिकारी यांच्याशी संपर्क साधावा असे अवाहन रायगड जिल्हा परिषदेचे कृषी विकास अधिकारी एल.के.खुरकुटे यांनी केले आहे.

दरम्यान, योजनेचा लाभ घेण्यासाठी तालुक्यातील शेतकर्‍यांनी पंचायत समितीच्या कृषी विभागाकडे अर्ज करण्याचे आवाहन उरण पंचायत समितीचे तालुका कृषी अधिकारी ईश्वरचंद्र चौधरी व विस्तार अधिकारी प्रतिमा गोरे यांनी उरण तालुक्यातील शेतकर्‍यांसाठी केले आहे. यात राज्य शासनाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वावलंबन योजनेंतर्गत सिंचन सुविधा करण्यासाठी अनुसूचित जाती, नव बौद्ध शेतकर्‍यांसाठी नवीन विहीर, जुनी विहीर दुरुस्ती, इनवेल बोरिंग, पंप सेट, वीज जोडणी, शेततळ्यासाठी प्लास्टिक अस्तरीकरण, सूक्ष्म सिंचन, ठिबक संच, तुषार संच आदी योजना मंजूर आहेत. तर राज्य शासनाच्या बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेअंतर्गत अनुसूचित जाती जमातीच्या शेतकर्‍यांसाठी नवीन विहीर, जुनी विहीर, दुरुस्ती, इनवेल, बोरिंग, पंपसेट, वीज जोडणी, शेततळ्यासाठी प्लास्टिक अस्तरिकलरण, सूक्ष्म सिंचन, ठिबक संच, तुषार संच, पाइपलाइन, परसबाग आदी योजना असल्याचे सांगण्यात येत आहे.

केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत सिंचन सुविधा निर्माण करण्यासाठी अनुसूचित जाती जमातीतील प्रवर्गातील शेतकर्‍यांना नवीन विहिरी बांधण्याकरिता रक्कम रुपये २५०००० देय पर्यंत अनुदान आहे. दरम्यान, जिल्हा परिषद सेसमधून सर्वांकष पीक संरक्षण योजनेंतर्गत ७५ टक्के अनुदानाने पीक संरक्षण, औषधाचा पुरवठा तसेच शंभर टक्के अनुदानातून महिला बचत गट, शेतकरी गट यांना कडधान्य तसेच भाजीपाला बियाणांचे मिनी किट, रब्बी उन्हाळी हंगामात ५० टक्के अर्थसहाय्याने भुईमुगाचे बियाणे त्याचबरोबर शेतकर्‍यांची पूर्ण संमती घेऊन खरेदी केलेल्या ताडपत्री वर ७५ टक्के अनुदान मिळणार आहे.

याचप्रमाणे ७५ टक्के अनुदानातून शेतकर्‍यांना सौरऊर्जेवर चालणारे घरगुती दीप संच, शेतीविषयक सुधारित अवजारे याच योजनेतून भाजीपाला लागवड प्रोत्साहन योजना, सेंद्रिय शेती प्रोत्साहन म्हणून जीवामृत व बिजामृत तसेच कंपोस्ट खत निर्मिती व गांडूळ खताची निर्मितीही ७५ टक्के अनुदानातून शेतकर्‍यांसाठी उपलब्ध आहे. तर ७५ टक्के अनुदानातून भाजीपाला फळ पिके लागवडीसाठी मच्लिंग पेपरचा वापरही करता येईल असेही सांगण्यात आले.



**पनवेल : भाजप गव्हाण जिल्हा परिषद सरचिटणीस निलेश खारकर यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, निकिता खारकर आदी उपस्थित होते.**



**पनवेल : हिंदू धर्मात सर्वपित्री अमावस्येला विशेष महत्त्व आहे. या दिवशी कुटुंबातील पित्तरांचे स्मरण करून पितररूपी कावळ्यांना नैवेद्य अर्पण केला जातो. सर्वपित्री अमावस्येनिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनीही शिवाजीनगर येथील निवासस्थानी पिताजी स्व. चांगू काना ठाकूर आणि मातोश्री स्व. भागूबाई चांगू ठाकूर यांना आदरांजली अर्पण केली.**

## कपिल पाटील फाउंडेशनचा उरणमध्ये वैद्यकीय मदत कक्ष

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**

कपिल पाटील फाउंडेशन वैद्यकीय मदत कक्ष हे केंद्रीय पंचायतराज राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या सहकार्यातून कार्यरत असून या मदत कक्षातून गरीब, गरजू व दुर्बल घटकातील आणि निर्धन रुग्णांना मदत व मार्गदर्शन केले जाते. ही मदत फक्त गंभीर आजार आणि शस्त्रक्रियांसाठी करण्यात येत आहे. उरणमध्येदेखील हे मदत कक्ष सुरू झाले आहे.

पंतप्रधान वैद्यकीय मदत निधी, मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि विविध ट्रस्टद्वारे गोरगरीब रुग्णांना मदत मिळवून देण्यासाठी कपिल पाटील फाउंडेशन वैद्यकीय मदत कक्ष ही समन्वयाची भूमिका पार पाडत आहे. हे वैद्यकीय मदत कक्ष अगोदर केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या मतदारसंघापुरती मर्यादित होती, परंतु आता उरण तालुक्यातील खोपटे येथील तरुण कार्यकर्ते गोरख ठाकूर यांच्या प्रयत्नामुळे ही सेवा उरण तालुक्यातही मिळणार आहे.

उरणमधील गरजू रुग्णांनी या वैद्यकीय मदत कक्ष व वैद्यकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी ९७०२५३५१६९ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन गोरख ठाकूर यांनी केले आहे.

## विद्यार्थ्यांना शैक्षणिक, क्रीडा साहित्याचे वाटप

### जेएनपीटी एससी, एसटी एम्प्लॉईज वेल्फेअर असोसिएशनचा उपक्रम



**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्टचे एससी, एसटी एम्प्लॉईज वेलफेअर असोसिएशनच्या माध्यमातून व सुधागड तालुक्यातील हातोंड गावचे पोलीस हवालदार राजेंद्र रघुनाथ वाघमारे यांच्या प्रयत्नातून आणि प्रमोद पवार (खोपोली) यांच्या सहकार्यातून रायगड जिल्हा परिषदेच्या हातोंड शाळेच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, क्रीडा साहित्य देण्यात आले.

शाळेचे मुख्याध्यापक अजितसिंह पाटील यांनी स्वागत केले. हा उपक्रम साध्य करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष देवानंद पवार, सचिव प्रमोद पवार, कोषाध्यक्ष विभव कांबळे आदींनी मेहनत घेतली. या वेळी मुख्य व्यवस्थापक (प्रशासन) जयवंत ढवळे, सचिव जेएनपीटी (प्रबंध कार्मिक आणि औद्योगिक संबंध) मनीषा जाधव, कार्मिकचे उप प्रबंधक संजीव पगारे, संस्थेचे अध्यक्ष देवानंद पवार, सचिव प्रमोद पवार, कोषाध्यक्ष विभव कांबळे, उपाध्यक्ष शंकर शिंदे, सहसचिव संदीप कांबळे, सह खजिनदार धनंजय धकिते, कार्यकारिणी सदस्य संजीव पगारे, सुभाष ठाकरे, बापू जाधव, राजेश सोनकुसरे, विल्सन सिंग, विनय पवार, अरुण बोकाडे, साधना धिवार, उज्वला निकालजे, नरेश कोळी, निवास कांबळे आदी असोशिएशनच्या वतीने उपस्थित होते.

या दातृत्वाच्या उपक्रमास ग्रुप ग्रामपंचायत हातोंडच्या ग्रामसेविका ज्योती मदने, चंदरगाव केंद्रप्रमुख घनश्याम हाके, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष स्वाती मोरे, शिक्षणतज्ञ आकाश भांडीलकर, अर्चना वाघमारे, रोहिणी भांडीलकर, मुख्याध्यापक अजितसिंह पाटील, सहशिक्षक योगेश भांड, अंकुश काकरा आदींची उपस्थिती, सहकार्य, मार्गदर्शन लाभले.

## केबीपी कॉलेजची मोखाड्यातील आश्रमशाळेला मदत

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून, संस्थेच्या मोखाड्यातील आश्रम शाळेला वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजने विविध स्वरूपात मदत दिली.

प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांनी दुर्गम, आदिवासी भागातील विद्यार्थांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन त्यांना मदत करण्याचे नियोजन केले होते. त्यानुसार महाविद्यालयातील सिनियर व ज्युनिअर विभागातील बहुसंख्य विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचार्‍यांनी विविध स्वरूपातील भरीव मदत संकलित केली. यामध्ये टॅब, गणवेश, बॅग्ज, शैक्षणिक साहित्य व जीवनावश्यक वस्तूंचा समावेश आहे.



कर्मवीरांच्या कार्याला स्मरून केबीपी कॉलेजने यावर्षी मोखाडा येथील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळेतील ६०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व जीवनाश्यक वस्तूंच्या स्वरुपात मदत दिली. या स्तुत्य उपक्रमाबद्दल मोखाडा येथील आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकांनी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांचे आभार मानले.

हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी कर्मवीर जयंती समितीचे चेअरमन व उपप्राचार्य प्रा. सी. डी. भोसले, उपप्राचार्या डॉ. राजश्री घोरपडे, डॉ. व्ही. बी. पुजारी, डॉ. हर्षा गोयल, डॉ. लक्ष्मण गवळी, प्रा. गायत्री भागवत, डॉ. केशव शिंदे, प्रा. सुजाता बोटे व कर्मवीर समितीतील सर्व सदस्यांनी मोलाचे सहकार्य केल्याची माहिती प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांनी दिली.

## राष्ट्रीय वार्षिक परिषदेत तळोजातील दीपक नायट्राइट कंपनीची बाजी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बडोदा येथे शनिवारी (दि. २४) झालेल्या क्वालिटी सर्कल फेडरेशन ऑफ इंडियाच्या ३३व्या राष्ट्रीय वार्षिक परिषदेत तळोजातील दीपक नायट्राइट लि.च्या संघाने बाजी मारत गोल्ड ट्रॉफीवर आपले नाव कोरले.



दीपक नायट्राइट लि. तळोजाच्या डीएनएल–टिसीडी अचिवर्स या संघाने ५ड च्या माध्यमातून कार्यस्थळ सुधारणावर आपले सादरीकरण करून कंपनीत होत असलेल्या सातत्यपूर्ण सुधारणांची वस्तुनिष्ठ सादरीकरण करून माहिती दिली आणि समन्वयकांची मने जिंकली. या परिषदेत देशभरातील नामांकित कंपन्यांनी सहभाग नोंदवला होता.

दीपक नायट्राइट लि. तळोजाच्या डीएनएल–टिसीडी अचिवर्स या संघाचे नेतृत्व क्यूसी हेड विकास वाकडे यांनी केले, तर डी. एस. मोहिते आणि किरण म्हात्रे यांचे उल्लेखनीय योगदान होते. या उपक्रमाचे प्रायोजक कंपनीचे बिझनेसहेड एस. आनंद, तर सूत्रधार यूनिटहेड एम. गणेशन होते. संघाचे व्यवस्थापन कंपनीचे प्लांट एचआर हेड भारत सकपाळे यांनी केले. विजयी संघावर विविध स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## ‘सीकेटी’त राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिन आणि कर्मवीर जयंती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तरुण युवक–युवतींमध्ये महविद्यालयीन जीवनातच सामाजिक बांधिलकी, आणि उत्तरदायित्वाची भावना निर्माण करण्यासाठी भारत सरकारने २४ सप्टेंबर १९६९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाची मुहूर्तमेढ केली, त्या उपक्रमाचा ५३ वा वर्धापन दिन व पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील ह्यांच्या जयंतीचे औचित्य साधुन शनिवारी (दि. २४) सकाळी ११ वाजता जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज (स्वायत्त)च्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे राष्ट्रीय सेवा योजना: कौशल्य विकासाचे व्यासपीठ या विषयावर अतिथी सत्र झाले.

प्रस्तुत सत्रास शालिक गिरिधर पवार (उपायुक्त, कौशल्य विकास, रोजगारिता तथा उद्योजकता, विभागीय आयुक्तालय, कोकण भवन, नवी मुंबई) हे प्रमुख अतिथी वक्ते म्हणून उपस्थित होते. प्राचार्य प्रा. डॉ. एस. के. पाटील यांनी महाविद्यालयाच्या सुवर्णमय कामगिरींचा मागोवा, राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाची ध्येय–धोरणे आणि कार्याचा आढावा तसेच कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान सांगितले.

राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. सुर्यकांत परकाळे यांनी प्रास्ताविकात राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व विषद केले. संस्थेकडून सतत मिळणाऱ्या प्रोत्साहनाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. आकाश पाटील यांनी कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी शालिक पवार यांचा परिचय दिला व मुख्य अतिथी शालिक पवार यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करीत असताना भारतासारख्या विकसनशील राष्ट्राच्या उत्थानासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व पटवून दिले. हे करीत असताना कौशल्य विकासाचे महत्त्व उद्धृत केले. तत्समवेत समाजातील बहुजन, शोषित, वंचित घटकांच्या शिक्षणासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याविषयीचे मंथन करून सगळ्यांना अभिभूत केले.

महाविद्यालयातील कृष्णाली जोशी व रूचिता ठोंबरे ह्या स्वयंसेवीकांनी तथा प्रवीण शेंडगे या माजी स्वयंसेवकाने आपले मनोगत मांडले. आभार महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. अपूर्वा ढगे यांनी मानले व सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी प्रा. कीर्ती वर्मा यांनी केले.

कार्यक्रमास अर्थशास्त्र विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक तथा राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. काकासाहेब ढवळे, माजी स्वयंसेवक प्रवीण शेंडगे व विक्रांत साठे व स्वयंसेवक–स्वयंसेविका उपस्थित होते.

यशस्वी नियोजनासाठी प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी मार्गदर्शन केले. कार्यवाहीकरिता राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. सुर्यकांत परकाळे, कार्यक्रम अधिकारी डॉ. योजना मुनीव, प्रा. आकाश पाटील, प्रा. अपूर्वा ढगे, प्रा. कीर्ती वर्मा ह्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले.

विशेष अतिथी सत्राच्या यशस्वी आयोजनाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.



**पनवेल : भाजपचे विहिघर येथील कार्यकर्ते जितेंद्र फडके (बाळूशेठ) यांना वाढदिवसानिमित्त जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, रवी शेळके, सोमनाथ पाटील, दर्शन शेळके, नशीब भगत, आकाश चोरघे आदी उपस्थित होते.**




वाचाल तर वाचाल!

जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...

**जाणून घ्या साहित्यिकांच्या आवडत्या पुस्तकांविषयी...**

महिन्याच्या पहिल्या आणि चौथ्या रविवारी ‘दैनिक राम प्रहर’च्या अंकात वाचा नवे पाक्षिक सदर वाचाल तर वाचाल. या सदरात दर पंधरवड्याला आमच्या प्रिय वाचकांच्या भेटीला आणणार आहोत.

साहित्यिकांची आवडती पुस्तके येत्या २ ऑक्टोबर २०२२ रोजीच्या रविवारी वाचूया डॉ. शीतल मालुसरे (महाड) यांच्या आवडत्या पुस्तकांविषयी त्यांच्याच लेखातून.

# निवडणुकीच्या तोंडावर खोपोली राष्ट्रवादीत धुसफूस

## अनेक नेते शिंदे गटात जाण्याची शक्यता

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिका निवडणूक कार्यक्रम कधीही जाहीर होण्याची शक्यता आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्ष तयारीला लागले आहेत. शिवसेनेत पडलेल्या फुटीनंतर शिंदे गटाचे आमदार महेंद्र थोरवे यांच्या माध्यमातून खोपोलीत शिंदे गट अधिक मजबूत करण्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू आहेत. महेंद्र थोरवे यांनी या अभियानात राष्ट्रवादी काँग्रेसला मुख्य टार्गेट केले आहे. राष्ट्रवादीचे खोपोलीतील अनेक बलाढ्य नेते थोरवे यांना साथ देत असल्याने निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर खोपोली पालिकेत मागील १५ वर्षे सत्तेत असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये मोठी धुसफूस सुरू झाली आहे.

मागील आठवड्यात खासदार व राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय सरचिटणीस सुनिल तटकरे यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आढावा बैठक झाली. या आढावा बैठकीला खोपोलीतील अनेक नेत्यांनी दांडी मारली. यात वरिष्ठ नेते व माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर, सुमन औसरमल, माजी उपनगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, माजी गटनेते मंगेश दळवी, ज्येष्ठ नेते मोहन औसरमल, शहर अध्यक्ष मनिष यादव व या नेत्यांचे समर्थक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दांडी मारली. याची दखल घेत खासदार सुनिल तटकरे यांनी नाराज नेते व पदाधिकाऱ्यांशी चर्चा केली जाईल, हे स्पष्ट केले. दुसरीकडे पक्ष कोणासाठी थांबत नाही, गद्दार व दगाफटका करणाऱ्यांना जनता माफ करणार नसल्याचे जाहीरपणे सांगून या नेत्यांना कडक इशारा दिल्याचेही बोलले जात आहे.

एकीकडे आगामी नगरपालिका निवडणुकीत सत्ता कायम ठेवण्यासाठी खासदार सुनिल तटकरे यांच्या नेतृत्वाखाली माजी आमदार सुरेश लाड व स्थानिक नेते प्रयत्न करीत असतांना दुसरीकडे खोपोलीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडण्याचे चित्र निर्माण झाले आहे. आमदार महेंद्र थोरवे यांच्या नेतृत्वाखाली शिंदे गटात समाविष्ट होण्यासाठी आम्हचे ठरले असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक नेते खासगीत सांगत असल्याने खोपोलीत राष्ट्रवादीसमोरच्या अडचणी वाढण्याची शक्यता निर्माण झाल्या आहेत.

**'मविआ'च्या घडामोडींवर भाजपचे सावध लक्ष**

**आगामी निवडणुकीत खोपोलीत महाविकास आघाडी ठेवत राष्ट्रवादी, उद्धव ठाकरे गट व काँग्रेस पक्ष एकत्रितपणे निवडणुकीला सामोरे जाण्याची तयारीही वरिष्ठ नेत्यांकडून सुरू आहे. दरम्यान भाजप या सर्व घडामोडींवर सावधपणे लक्ष ठेवून आहे.**

# खांब नाका येथे खैराची तस्करी; वनविभागाची कारवाई

**धाटाव : प्रतिनिधी**



मुंबई-गोवा महामार्गावर कोलाडजवळील खांब नाका येथे वन विभागाने खैर लाकूडाची तस्करी करणाऱ्यांवर धडक कारवाई करीत मुद्देमालासह एक वाहन जप्त केले. ही कारवाई शनिवारी (दि. २४) पहाटे २ वा. च्या सुमारास करण्यात आली.

मुंबई-गोवा महामार्गावर विनापरवाना खैर लाकूडाची वाहतूक होत असल्याची माहिती वनविभागाला समजताच, रोहा उपवन संरक्षक व सहाय्यक वनसंरक्षक विश्वजित जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली वन परिक्षेत्र अधिकारी मनोज वाघमारे, वनपाल राजेंद्र गायकवाड, वनरक्षक एस. डी. देवकांबळे, एस. एस. भगत, एस. एन. शिद, एस. एम. मुळे, अंगद भोसले, मंगेश पव्हरे, तेजस नरे, योगेश देशमुख, पोपट करांडे, अजिंक्य कदम यांनी खांब नाका येथे सापळा रचून शनिवारी टेम्पो (क्र. एमएच.०६ बीडबल्यू ५५७१) या वाहनाची तपासणी केली असता त्यात ८,२५५ रुपये किमतीचे खैर सोळीवचे ४८ नग आढळून आले.

कारवाईत खैर जातीचे लाकूड व चार लाख रुपये किमतीचे वाहन असे एकूण चार लाख आठ हजार २५५ रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. भारतीय वनअधिनियम १९२७ अंतर्गत डिमाजी पवार (रा. चिंचवली) व अनंता वाघमारे (रा. पाले) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मुरूडमध्ये मुख्याधिकाऱ्यांकडून नगर परिषद शाळेच्या कामाची पाहणी



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड शहरातील सार्वजनिक वाचनालयाजवळ असणाऱ्या नगरपरिषद शाळा क्र. २च्या जुन्या इमारतीचे नूतनीकरण करण्यात आले असून त्याची पाहणी शनिवारी (दि. २४) प्रशासक तथा मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी केली आहे.

शाळा क्रमांक २ची इमारत जुनी झाली होती. त्यामुळे तिचे स्ट्रक्चरल ऑडिट मुरूड नगर परिषदेमार्फत करण्यात आले. अहवालानुसार इमारतीची दुरुस्ती व नूतनीकरण जलद गतीने पूर्ण करण्यात येत आहे. शाळा क्रमांक २मधील विद्यार्थी सध्या शाळेचे काम सुरू असल्याने शाळा क्रमांक १मध्ये बसत आहेत.

अलिबाग-मुरूड विधानसभा क्षेत्राचे आमदार महेंद्र दळवी यांनी शहरातील विकासकामांसाठी कोट्यवधींचा निधी उपलब्ध करून दिल्यामुळे सर्व नगर परिषद शाळांची कामे जलद गतीने पूर्ण करण्याचा प्रयत्न मुख्याधिकारी पंकज भुसे करीत आहेत.

मुलांची व्यवस्था लवकरात लवकर या शाळेत व्हावी म्हणून मुख्याधिकारी भुसे यांनी स्वतः पाहणी करून काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आदेश संबंधित ठेकेदारास दिले आहेत. या वेळी अभिजीत कारभारी, मितेश माळी आदी उपस्थित होते.

# संस्कृत पंडित सदाशिव रहातेकर यांचा सत्कार

**कर्जत : बातमीदार**

संस्कृत पंडित म्हणून संबोधले जाणारे कर्जत येथील सदाशिव रहातेकर यांच्याकडे समाजाचे दुर्लक्ष झाल्याची माहिती समाज माध्यमे यांच्याकडून घेतली गेली. त्यानंतर शिवसेनेच्या शिंदे गटाचे उपजिल्हा प्रमुख भाई गायकर यांनी रहातेकर यांची यांच्या निवासस्थानी भेट घेऊन त्यांच्या संशय जाणून घेतल्या.

संस्कृत पंडित म्हणून ओळखले घेतले जाणारे सदाशिव राहतेकर यांना निवृत्ती काळात काय करावे, असा प्रश्न पडला आहे, मात्र रहातेकरांनी यांच्या आवडत्या संस्कृत विषयात मग्न राहून वयाच्या नव्वदाव्या वर्षातही संस्कृत सारख्या अवघड विषयातील साहित्यात त्यांनी केलेल्या योगदानाबद्दल त्याची प्रशंसा करून त्याचा उचित सत्कार केला. या वेळी भाई गायकर तसेच अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.



# कोठिंबे शाळेत शिक्षण परिषद उत्साहात



**कर्जत : प्रतिनिधी**

कशेळे केंद्राची केंद्रस्तरीय शिक्षण परिषद राजिप प्राथमिक शाळा कोठिंबे येथे उत्साहात झाली.

शिक्षण परिषेदेचे अध्यक्षस्थान केंद्रप्रमुख अरुण पारधी यांनी भूषविले. शिक्षण परिषेदेत दरमहा विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी विविध चर्चा झाली.

कोठिंबे शाळेचे पदोन्नती मुख्याध्यापक छगन मेंगाळ यांनी केंद्र कशेळेच्या वतीने शिक्षक दिनानिमित्त यूनिटी वेलफेअर क्लब ऑफ मुंबई या संस्थेकडून आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित झालेल्या केंद्रप्रमुख अरुण पारधी, पदवीधर विषय शिक्षक विजय जगताप, कुसुम हिंगे, शिवकन्या सदानंदे, पंढरीनाथ पाटील यांनी शिक्षकांचे पुष्पगुच्छ व श्रीफळ देऊन स्वागत केले.

केंद्रप्रमुख अरुण पारधी यांनी प्रस्ताविक केले. विजय जगताप यांनी विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षक कटीबद्ध आहे, असे सांगितले. शिक्षण परिषदेमध्ये शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शन, इ.५वी गणित जोशी, अकादमी कशेळे, ज्ञानरचनावाद, हरिभाऊ दहिफळे, शाळा पिंगळेवाडी, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन व प्रशासकीय विषयावर केंद्रप्रमुख अरुण पारधी यांनी मार्गदर्शन केले, तर यशोगाथा अनंत खैरे शाळा सुगवे यांनी सादर केली.

सूत्रसंचालन बालाजी चौसष्टे यांनी केले, तर आभार आशीष उंबरे यांनी मानले.

# म. ह. दिवेकर विद्यालयात बक्षीस वितरण

**मुरूड : प्रतिनिधी**



कोकण एज्युकेशन सोसायटी संचलित वाणदे-जोसरंजन हायस्कूल येथे शासनाच्या वतीने आदिवासी विद्यार्थ्यांना सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त २०२०-२१ या वर्षातील इ. ५ वी ते ७ वीमधील विद्यार्थ्यांना १५०० रुयांचे चेकवाटप करण्यात आले, तर विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी इ. ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांची हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली होती. यामधून तीन यशस्वी विद्यार्थ्यांना रोख रक्कम प्रदान करण्यात आली.

या वेळी शाळेचे चेरमन तुकाराम पाटील यांनी सांगितले की, जीवनात यशस्वी होण्यासाठी वेळच्या वेळी अभ्यास करणे खूप आवश्यक आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांचे हस्ताक्षर सुधारले पाहिजे यासाठी हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आलेल्या आहेत. हस्ताक्षर सुंदर असेल, तर या स्पर्धेच्या युगात टिकू शकणार आहे. हस्ताक्षर चांगले व वळणदार होण्यासाठी सर्व करणेसुद्धा आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आहे. बक्षीस वितरण चेरमन तुकाराम पाटील, मुख्याध्यपक समीर जठारी यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहाय्यक शिक्षक योगेश भगत यांनी केले.

# नागोठण्यात उत्कृष्ट काम करणाऱ्यांचा सन्मान

**नागोठणे : प्रतिनिधी**

श्री अष्टविनायक ग्रामीण बिगरशेती सह. पतसंस्थेच्या २४व्या वार्षिक सर्वसाधारण सभा शुक्रवारी (दि. २३) उत्साहात झाली.

या सभेत शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या उल्लेखनिय काम करणाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. आपल्या अध्यक्षीय भाषणात पतसंस्थेचे चेअरमन विलास चौलकर यांनी कोरोना काळात सर्वत्र मंदीची लाट आली असतानाही आपल्या संस्थेने सर्वांच्या सहकार्याने चांगले कार्य केले. एकीचे बळ व संचालकांच्या एक जुटीमुळे संस्थेची प्रगतीकडे वाटचाल होत आहे, असे सांगितले, तसेच सर्व भागधारकांना नऊ टक्के लाभांश देत असल्याचे शेवटी जाहीर केले.

या वेळी राजन जगताप, दिनेश कोळी, शरद वाडेकर, महादेवसिंग परदेशी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाला लेखा परीक्षक दिनेश कोळी, पोलीस निरीक्षक राजन जगताप, शिवराम शिंदे, संस्थेचे संस्थापक जयराम पवार, व्हाईस चेअरमन महादेवसिंग परदेशी, सचिव आरती हातनोलकर, नामदेव चितळकर, चंद्रकांत गायकवाड, डॉ. अनिल गिते, यशवंत चित्रे, किशोर म्हात्रे, राजेंद्र मोदी, निलोफर पानसरे, श्वेता चौलकर, नंदाताई गायकवाड, रोहिदास हातनोलकर, सुदाम घाग, अशोक भंडारे, संतोष चितळकर, प्रसाद जोगत, रवी वाजे, रतन हेंडे तसेच कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

# चौलच्या श्री सद्गुरू ग्रामीण पतसंस्थेची वार्षिक सभा उत्साहात

**रेवदंडा : प्रतिनिधी**

चौलच्या श्री सद्गुरु ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेची २६वी वार्षिक सर्वसाधारण सभा गुरूवारी (दि. २२) घेण्यात आली. या वेळी ज्येष्ठ सभासद व गुणवंत विद्यार्थी सत्कार करण्यात आला होता.



या वेळी अध्यक्ष प्रविण राऊत यांचेसह उपाध्यक्ष सुधाकर म्हात्रे, सेक्रेटरी असिफ किरकिरे, खजिनदार प्रतिक्षा राऊत, संचालक प्रथमेश राऊत, संचालक शुभांगी पाटील, संचालक विश्वनाथ म्हात्रे, संचालक हरिश्चंद्र टेकाळकर, संचालिका ज्योती म्हात्रे, संचालक प्रविण बाजी, कायदेशीर सल्लागार ॲड महेश म्हात्रे, व्यवस्थापक महेंद्र म्हात्रे, उपव्यवस्थापकए निलेश राऊत आदी मंडळीची उपस्थित होते.

प्रथम दिवंगताना श्रद्धाजंली अर्पण करण्यात आली. संचालक मंडळाचे वतीने पतसंस्थेचे अध्यक्ष प्रविण राऊत यांचा सत्कार करण्यात आला. संचालक असिफ किरकिरे यांनी मागील सभेचे इतिवृत्त वाचन, आर्थिक वर्षाचा अहवाल वाचन, तेरीज, नफा-तोटा व ताळेबंद पत्रक वाचन करून मंजुरी घेण्यात आले. त्यानंतर ज्येष्ठ सभासदांचा सत्कार, तसेच १०वी व १२वीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.


# नवरात्रोत्सवानिमित्त झेंडूची फुले बाजारपेठेत दाखल

## आवक कमी अन् मागणी वाढली

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

नवरात्रोत्सवानिमित्त बाजारपेठेत झेंडूची फुले दाखल झाली आहेत, मात्र आवक कमी आणि मागणी जास्त असल्याने यंदा फुलांचे दर वाढले आहेत. सध्या झेंडूची फुले १८० ते २०० रुपये किलोने विकली जात आहेत.

नवरात्रोत्सवानिमित्त देवीच्या मंदिरांसह इतरही मंदिराची साफसफाई, रोषणाई करण्यात आली आहे. नऊ दिवस जागर असतो. काही ठिकाणी यात्रा भरवण्यात येणार असल्याने फुले, हार, पूजेचे साहित्य, खेळणी, घरगुती साहित्य, खाद्यपदार्थांची दुकाने सजली आहेत. नवरात्रोत्सवाला सोमवार (दि. २६) पासून सुरुवात होणार असून दसऱ्यापर्यंत जल्लोष साजरा होणार आहे. नऊ दिवसांत झेंडूच्या फुलांना मागणी असल्याने जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागात बाजारपेठा, नाक्यानाक्यावर झेंडूच्या फुलांनी बाजारपेठा सजल्या आहेत, तसेच खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी होत आहे. पावसामुळे फुलांचे उत्पादन कमी झाल्याने किमती वाढल्याचे विक्रेत्यांकडून सांगण्यात येत आहे.



**झेंडू व शेवंतीच्या फुलांना नवरात्रोत्सवात मागणी असते. गेल्या अनेक दिवसांपासून बाजारात ही फुले दाखल झाली असून ग्राहकांकडून मागणी वाढली आहे. सततच्या पावसामुळे उत्पादनावर परिणाम झाल्याने किमती वाढल्या आहेत.**

**-रवीकिरण आंबेकर, फूल विक्रेत**

**झेंडूची फुले नवरात्रोत्सवात मोठ्या प्रमाणात वापरली जातात. नऊ दिवस घटाला माळ अर्पण करण्यासाठी देवीच्या हारासाठी झेंडू, शेवंतीच्या फुलांना विशेष मागणी असते. यंदा किमती वाढल्या असल्या तरी उत्सव असल्याने पूजेसाठी फुले खरेदी करावीच लागतात.**

**-आशा चव्हाण, महिला**

# चौल येथे आरोग्य तपासणी शिबिर

**रेवदंडा : वार्ताहर**

पाचकळशी समाज चौल व नवनिर्माण पाचकळशी माळी समाज अलिबाग यांचे प्रयत्नाने व अध्यक्ष सुरेश घरत (कोटकर) व माऊली क्लिनिक पुणे यांचे विद्यमाने आरोग्य तपासणी शिबिर चौल पाठारे क्षत्रीय समाज हॉल येथे नुकताच झाले.



पाचकळशी माळी समाज अध्यक्ष सुरेश घरत (कोटकर) यांचे प्रयत्नातून व माऊली क्लिनिक पुणे एमबीबीएस डॉ. राजेंद्र पोटे यांचे विद्यमाने आयोजित आरोग्य तपासणी शिबिरास सकाळी नऊ वाजता प्रारंभ झाला, पाचकळशी समाज चौल व नवनिर्माण पाचकळशी माळी समाज अलिबाग यांचे सहकार्य लाभले. या आरोग्य तपासणी शिबिरास ३५०० रूपयांच्या ३५पेक्षा जास्त टेस्ट अवघ्या ३५० रुपयामध्ये उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या, तसेच भारत सरकारच्या आयुष्य मंत्रालयाने प्रमाणिक केलेली शुद्ध आयुर्वेदिक औषधे आवश्यतेनुसार उपलब्ध करण्यात आले होते.

या आरोग्य तपासणी शिबिरास चौल पाचकळशी समाज अध्यक्ष सुरेश घरत, उपाध्यक्ष अनंत घरत, झिराड पाचकळशी समाज अध्यक्ष सुबोध राऊत, सेक्रेटरी मोहन पाटील, नितिन बुरांडे, पाचकळशी समाज शिक्षण फंड अध्यक्ष रविंद्र नाईक, उपाध्यक्ष सचिन म्हात्रे, वधुवर सुचक मंडळ अध्यक्ष नरेश म्हात्रे, सदानंद पडते, दिलिप राऊत, महेश नाईक, द. प. ठाकूर आदीसह यांचेसह डॉ. राजेंद्र पोटे, सुशांत पाटील, हर्षद गोळे, समिर वर्तक, नितिन कदम उपस्थित होते. पाचकळशी समाज अध्यक्ष सुरेश घरत (कोटकर) यांचे पाचकळशी समाज चौल यांचे वतीने उपस्थित माऊली क्लिनिक पुणे डॉ. राजेंद्र पोटे आणि सहकारी तसेच उपस्थित मान्यवरांचे स्वागत पुष्पगुच्छ प्रदान करून करण्यात आले.

पाचकळशी समाज अध्यक्ष सुरेश घरत यांनी मार्गदर्शन करताना, या आरोग्य तपासणी शिबीरास सहकार्य देऊन जास्तीत जास्त लोकांनी आरोग्य तपासणी करून घ्यावी, असे म्हटले. सकाळी नऊ वाजता सुरू झालेले आरोग्य तपासणी शिबिर रात्री दहा वाजेपर्यंत सेवेस उपलब्ध होते.

# पश्चिम विभागाने इतिहास रचला, दक्षिण विभागाला नमवून दुलीप करंडक जिंकला!




**कोईम्बतुर : वृत्तसंस्था**

भारताचा अनुभवी फलंदाज अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखाली पश्चिम विभागाने दुलीप करंडक स्पर्धा जिंकली आहे. त्यांनी अंतिम फेरीत दक्षिण विभागाचा २९४ धावांनी पराभव केला. पश्चिम विभागाने पहिल्या डावात २७० धावा केल्या होत्या. यानंतर दक्षिणेने पहिल्या डावात ३२७ धावा केल्या. पश्चिमने दुसऱ्या डावात चार बाद ५८५ अशी डोंगरी धावसंख्या उभारली. दक्षिण संघाला सामना जिंकण्यासाठी ५२९ धावांचे लक्ष्य मिळाले होते, पण दुसऱ्या डावात त्यांना केवळ २३४ धावाच करता आल्या. १९व्यांदा दुलीप करंडक जिंकण्यात पश्चिम विभागाचा संघ यशस्वी ठरला.

पहिल्या डावात पिछाडीवर पडल्यानंतर पश्चिम विभागाने दुसऱ्या डावात जबरदस्त पुनरागमन केले. चौथ्या दिवशी यशस्वी जैस्वाल (२६५), सर्फराज खान (१२७) आणि हेत पटेल (नाबाद ५१) यांच्या शानदार खेळीच्या बळावर पश्चिम विभागाने दुसरा डाव चार गडी गमावून ५८५ धावांवर घोषित केला. चौथ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत दक्षिण विभागाच्या सहा गडी गमावून १५४ धावा झाल्या होत्या. पाचव्या दिवशी संघाला धावसंख्येत केवळ ८० धावांची भर घालता आली.

अपयशी ठरलेल्या पहिल्या डावात यशस्वी जैस्वाल याने दुसऱ्या डावात झंझावाती द्विशतक झळकावले. त्याने २६५ धावा केल्या. सरफराज खान १२७ धावा आणि हेत पटेल ५१ धावा करीत नाबाद राहिले. यामुळे पश्चिम विभागाने दुसऱ्या डावात चार गडी गमावत ५८५ धावांचा डोंगर रचला. सामना सुरू असतानाच जैस्वाल सतत दक्षिण विभागाच्या फलंदाजांची खासकरून रवी तेजाची स्लेजिंग करत होता. पंचांनी जैस्वालला दोन-तीन वेळा इशाराही दिला, मात्र डावाच्या ५७व्या षटकात जैस्वालने पुन्हा एकदा तेच केले तेव्हा पंचांनी आवरले नाही आणि कर्णधार रहाणेशी त्याने बराच वेळ चर्चा केली. त्यानंतर जैस्वालला मैदान सोडावे लागले. विशेष बाब म्हणजे पंचांनी राखीव खेळाडूची परवानगी दिली नाही, ज्यामुळे रहाणेच्या संघाला काही षटके १० खेळाडूंसह मैदानावर राहावे लागले. जैस्वाल तब्बल सात षटकांनंतर मैदानात परतला. तोच सामनावीर ठरला, तर मालिकावीराचा पुरस्कार उनाडकटने पटकाविला.

# भारतीय महिलांचा इंग्लंडला ‘व्हाइटवॉश’

## तिसरी वनडे जिंकून झुलनला विजयी निरोप

**लंडन : वृत्तसंस्था**

भारतीय महिला संघाने तिसऱ्या व अखेरच्या एकदिवसीय सामन्यातही बाजी मारून यजमान इंग्लंडला ‘व्हाइटवॉश’ दिला. प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारतीय संघाने ४५.४ षटकांत १६९ धावा केल्या होत्या. इंग्लंडचा डाव १५३ धावांवर संपुष्टात आला. अशा प्रकारे क्रिकेटची पंढरी अशी ख्याती असलेल्या लॉर्ड्स मैदानावर भारतीय महिला संघाने वेगवान गोलंदाज झुलन गोस्वामीला निर्भेळ यशाची भेट दिली.

स्मृती मानधना (५०), दिप्ती शर्मा (नाबाद ६८) व पूजा वस्त्राकार (२२) या तीन भारतीय फलंदाजांनाच दोन आकडी मजल मारता आली. त्यामुळे भारतीय संघाचा डाव ४५.४ षटकांत १६९ धावांत आटोपला होता.




आव्हानाचा पाठलाग करताना इंग्लंडची सात बाद ६५ अशी स्थिती झाली होती, मात्र चार्ली डिनने इंग्लंडच्या विजयासाठी प्रयत्न केले. अखेरीस चार्लीच धावबाद झाली आणि इंग्लंडचा डाव १५३ धावांवर संपुष्टात आला. भारताकडून रेणुका सिंगने २९ धावांत चार गडी, तर आंतरराष्ट्रीय कारकीर्दीतील अखेरचा सामना खेळणाऱ्या झुलनने दोन बळी मिळविले.

### ‘चकडा एक्स्प्रेस’ निवृत्त

इंग्लंडविरुद्धची तिसरी वनडे भारतीय वेगवान गोलंदाज झुलन गोस्वामीच्या आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील शेवटची होती. प्रथमच इंग्लंडला त्यांच्याच भूमीवर ‘क्लीन स्वीप’ करून चकडा एक्स्प्रेस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या झुलनला संघ सहकाऱ्यांनी संस्मरणीय निरोप दिला. झुलनला शेवटच्या सामन्यात दोन्ही संघांच्या खेळाडूंनी गार्ड ऑफ ऑनर दिला होता. याशिवाय नाणेफेकसाठी हरमनप्रीत कौर तिला सोबत घेऊन गेली. शेवटच्या सामन्यांत तिने दोन विकेट्स घेतल्या. झुलनने वनडेत २५५ विकेट घेतल्या आहे. तिच्या नावावर कसोटीत ४४ आणि टी-२०मध्ये ५६ विकेट आहेत. अशा प्रकारे झुलनने एकूण २८४ आंतरराष्ट्रीय सामन्यांत ३५५ विकेट्स घेतल्या.

# कर्णधार हरमनप्रीतकडून दिप्ती शर्माची पाठराखण

**लंडन : वृत्तसंस्था**

भारतीय महिला संघाने लॉर्ड्सवरील तिसऱ्या वनडेत इंग्लंडचा १६ धावांनी पराभव केला. या विजयासह भारताने एकदिवसीय मालिकेत इंग्लिश संघाचा ३-० असा धुव्वा उडवला, मात्र एका विकेटमुळे या सामन्यात वाद उद्भवला. यावर टीम इंडियाची कॅप्टन हरमनप्रीत कौरने प्रतिक्रिया देत गोलंदाज दिप्ती शर्माची पाठराखण केली आहे.




चेंडू टाकण्याआधीच क्रीझ सोडणारी इंग्लंडची खेळाडू शार्लोट डीनला भारतीय गोलंदाज दिप्तीने नॉन-स्ट्रायकरलाच बाद केले. सामन्यानंतर कर्णधार हरमनप्रीत कौरला या विकेटसंदर्भात विचारण्यात आले असता ती म्हणाली, आम्ही घेतलेल्या उर्वरित नऊ विकेट्सबद्दल तुम्ही विचारले नाही याचे मला आश्चर्य वाटते. मुळात यावरून क्रिकेटपटू म्हणून आपण किती सतर्क आहोत हे दिसून येते. आम्ही कोणतीही चूक केली नाही. ‘हा खेळाचा एक भाग आहे. आम्ही काही नवीन केलंय, असे वाटत नाही. मी माझ्या खेळाडूला पाठिंबा देईन. तिने नियमाबाहेर काहीही केलेल नाही.

दरम्यान, आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) अशा बाद करण्याच्या पद्धतीला परवानगी दिली आहे व शार्लोट बाद होणे हे नियमांनुसार उचित होते. या प्रकारे बाद करण्याला पूर्वी ‘मंकडिंग’ म्हणून ओळखले जात होते, परंतु आता नियम बदलल्यानंतर रन-आउट म्हणून वर्गीकृत केले गेले आहे.



पनवेल : नवरात्रोत्सवानिमित्त उलवे नोड येथील बंगाली सार्वजनिक दुर्गापूजा मंडळाच्या वतीने माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना निमंत्रण देण्यात आले. या वेळी चेअरमन देवीप्रसाद मित्रा, अध्यक्ष आनंददीपजी, सांस्कृतिक व कला विभागाचे संचालक देवालय मित्रा आदी उपस्थित होते.




पनवेल : अंत्योदय संकल्पनेचे जनक पं. दिनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला भाजपच्या तालुका व शहर मध्यवर्ती कार्यालयात जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यांच्यासमवेत पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



पनवेल : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मन की बात हा कार्यक्रम रविवारी प्रक्षेपित झाला. हा कार्यक्रम भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत तालुका यांनी पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयात, तर शहर अध्यक्ष जयंत पगडे यांनी नवनाथ नगर येथे टीव्हीवरून अनुभवला. त्यांच्यासमवेत माजी पं. स. सदस्य भूपेंद्र पाटील, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष आनंद ढवळे, माजी उपमहापौर चारुशीला घरत, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, प्रकाश बिनेदार, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका सुशिला घरत, भाजप नेते जगदिश घरत, विजय म्हात्रे, प्रतिक बहिरा, गोपीनाथ लोखंडे, डॉ. कृष्णा देसाई, संदीप पाटील, सुमित झुंझारराव, रोशन ठाकूर, राजेश गिरडा, प्रथमेश गुडेकर, गौरव चव्हाण यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.








दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com